# नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग,
## सातारा शाखा.

जा.क्र.हेरिटेज समिती/बैठक इतिवृत्त/ससंसा/२७१३

जिल्हा परिषद विस्तारीत इमारत,
दुरध्वनी क्र. ०२१६२ / २३९२४१
इमेल :-adtpsatara@rediffmail.com

प्रति,

सातारा दि. ११ /०८/२०१६.

१) श्री. दिलीप बंड, (निवृत्त आय.ए.एस.), **मा.अध्यक्ष**, हेरिटेज कॉन्झर्वेशन कमिटी

**मा.सदस्य** :

२) मा.जिल्हाधिकारी, सातारा.
३) श्री.रवि रानडे, स्ट्रक्चरल इंजिनिअर
४) श्री. अच्युत वाटवे, स्ट्रक्चरल इंजिनिअर
५) आर्किटेक्ट श्री.चेतन सहस्त्रबुध्दे
६) आर्किटेक्ट श्रीमती वैशाली प्रसाद लाटकर
७) प्रा.जय सामंत
८) डॉ.शिवाजीराव काशीनाथ चव्हाण
९) सहायक संचालक, पुरातत्व विभाग,येरवडा, पुणे
१०) मा.अधिक्षक, पुरातत्व विभाग,मुंबई सर्कल.
११) मा.सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे

**विशेष निमंत्रित** :

१२) मा.उपवनसंरक्षक, सातारा

**विषय** :- **सातारा, वाई, पाचगणी, महाबळेश्वर नगर परिषदा तसेच प्रादेशिक योजना महाबळेश्वर-पाचगणी क्षेत्राकरिताचे हेरिटेज कॉन्झर्वेशन समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.**

**संदर्भ** :- हेरिटेज कॉन्झर्वेशन कमिटीची दि.३.८.२०१६ रोजी संपन्न झालेली पहिली बैठक.

महोदय,

नियोजन भवन, सातारा येथे दि.३.८.२०१६ रोजी संपन्न झालेल्या हेरिटेज कॉन्झर्वेशन कमिटीच्या पहिल्या बैठकीचे इतिवृत्त सोबत पाठविण्यात येत आहे.

आपला,

सही/***
**(श्रीकांत देशमुख)**
**सदस्य सचिव,**
हेरिटेज कॉन्झर्वेशन समिती, तथा
सहायक संचालक, नगर रचना,
सातारा.

**प्रत** : १) जिल्हा नगर पालिका प्रशासन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा. यांना माहितीसाठी
२) मुख्याधिकारी, नगर परिषद, सातारा/वाई/पांचगणी/ महाबळेश्वर यांना माहिती व कार्यवाहीसाठी.
२/-इतिवृत्तात नमूद प्रपत्र सोबत जोडले आहे. त्याप्रमाणे समितीपुढे सादर करण्यात येणारी प्रकरणे प्रपत्रानुसार समितीच्या नियोजित बैठकीपुर्वी १५ दिवस अगोदर सदस्य सचिव यांचेकडे सादर करावीत.

``सातारा, वाई, पांचगणी व महाबळेश्वर नगर परिषद तसेच प्रादेशिक योजना, महाबळेश्वर पांचगणी क्षेत्र” याकरिता

**हेरिटेज कॉन्झर्वेशन कमिटी**

नियोजन भवन, सातारा येथे दि. ३.८.२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता संपन्न झालेल्या बैठकीचे

## इतिवृत्त

मा. अध्यक्ष, श्री. दिलीप बंड यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या हेरिटेज कॉन्झर्वेशन कमिटीच्या प्रथम बैठकीस मा.जिल्हाधिकारी, सातारा यांचेसह सर्व मा. सदस्य, विशेष निमंत्रित .उपवनसंरक्षक, सातारा व सातारा, वाई, पांचगणी व महाबळेश्वर नगर परिषदेचे मुख्याधिकारी उपस्थित होते. प्रथमत: नवनियुक्त समितीचे अध्यक्ष व मा.सहसंचालक, नगर रचना, पुणे यांचे मा.जिल्हाधिकारी, सातारा यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. तसेच उर्वरित सर्व सन्माननीय सदस्यांचे सदस्य सचिव तथा सहायक संचालक, नगर रचना, सातारा यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. तद्नंतर बैठकीच्या कामकाजास सुरूवात झाली.

सदस्य सचिव यांनी बैठकीची विषय सूची तसेच हेरिटेज समितीची कार्यकक्षा, हेरिटेज इमारतीचे ग्रेडींग व ग्रेडिंगनुसार विकासाचा वाव (scope) इ. बाबी विषद केल्या. त्यानंतर मा.जिल्हाधिकारी यांनी नियमावलीमधील महत्वाचे विविध मुद्दे नमूद करुन नगर परिषदांच्या मुख्याधिका-यांनी कलम ४ नुसार कार्यवाही करून स्थळांची यादी हेरिटेज कमिटीच्या सल्ल्याने अंतिम करावी अशा सूचना दिल्या.

मागील बैठकीचे इतिवृत्तानुसार पुढील समितीचे सलगतेने काम होण्याच्या दृष्टीने मागील दोन बैठकींची इतिवृत्ते सर्व सदस्यांना उपलब्ध करून देण्याचे ठरले.

सातारा शहराच्या बाबतीत १४९ मिळकतीपैकी ३८ हेरिटेज स्थळांचा अंतिम यादीमध्ये मुख्याधिकारी यांचेकडून समावेश करण्यात आला आहे. ती यादी अंतीम ठेवायची अगर कसे याबाबत चर्चा झाली. ३८ मिळकतींपैकी १५ मिळकतींचे बाबतीत मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे अपील दाखल असल्याचे मुख्याधिकारी, सातारा यांनी बैठकीत सांगीतले. सातारा येथील स्थळांच्या यादीबाबत दोन महिन्यात सर्वेक्षण (Rapid Survey) करून निर्णय घेणे आवश्यक आहे. काही यादया १० वर्षापूर्वीच्या आहेत त्याचे पुर्नविलोकन होणे आवश्यक असल्याची भावना काही सदस्यांनी बैठकीत बोलून दाखविली. त्याचप्रमाणे मुख्याधिकारी, वाई नगर परिषद, वाई यांनी वारसा स्थळांची यादी वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन सत्वर निश्चित करावी. तसेच यादीतील वारसा स्थळांचे सादरीकरण समितीसमोर करणेबाबत सूचना देण्यात आल्या.

एखादया मिळकतीचा यादीमध्ये समावेश करताना ती खरोखरच वारसा स्थळ आहे का हे पटवून दिले गेले पाहिजे. काही वाडयांना केवळ त्यांचे वयाची १०० वर्षे पूर्ण झाली म्हणून त्यांचा वारसा जतन करावा, असे होत नाही. काही ठिकाणी तर एक दोन-वास्तू मर्यादित न ठेवता संपूर्ण परिसर हेरिटेज म्हणून जाहीर केला जातो, २-३ व्यक्तींमार्फत अथवा खाजगी संस्थेमार्फत वारसा स्थळे निश्चित करण्यामुळे अन्याय संभवतो. त्याऐवजी अधिकअधिक लोकांमार्फत ती निश्चित केल्यास अचूकता व पारदर्शकता येईल. मंजूर नियमावलीतील हेरिटेज मिळकत ठरविण्याच्या मार्गदर्शक सूचना ढोबळ स्वरूपाच्या आहेत, त्याचा सूक्ष्म स्तरावर (Micro level) विचार होणे आवश्यक आहे, असे सदस्य श्री रानडे यांनी प्रतिपादन केले. वारसा स्थळे निश्चित करून त्यांचा इतिहास / वैशिष्टये इ. माहिती जमा करावी लागेल. अशा प्रकारचे काम करण्यास कोणी गठीत समितीतील सदस्य इच्छुक असल्यास त्यांनी त्याबाबतचा अहवाल सादर करावा, असे मा. अध्यक्ष यांनी सांगीतले. एखादया मिळकतीचे स्थानिक अथवा प्रादेशिक महत्व/इतिहास बघूनच त्याचा हेरिटेज यादीमध्ये समावेश केला जावा असे सहसंचालक, नगर रचना यांनी बैठकीत सूचना मांडली. किल्ले अजिंक्य तारा, राजवाडा, संगम माहुली या स्थळांचा हेरिटेज यादीमध्ये समावेशाबाबत सदस्य डॉ.शिवाजीराव चव्हाण यांनी सूचना मांडली. त्यावर सदस्य श्री वाटवे यांनी मिळकतींची स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी तपासूनच त्यांचा यादीत समावेश व्हावा, वारसा स्थळांच्या डागडुजीसाठी निधी उभा केला जावा, तसेच कमिटीमध्ये एक फायर ऑफीसर असावा असे मत मांडले. स्थूल यादी तयार करून विहीत वेळेत निर्णय घेणेबाबत मा.जिल्हाधिकारी यांनी सांगीतले. हेरिटेज यादी सादरीकरण महत्वाचे आहे. सादरीकरण बघूनच पुढील बैठकीत त्यावर चर्चा करावी असे अध्यक्षांनी प्रतिपादन केले.

महाबळेश्वर, पांचगणी येथे हेरिटेज स्थळांना भेटी देणा-या पर्यटकांकडून एकत्रित कर वसूलीबाबत चर्चा झाली. यासाठी नगर परिषद मुख्याधिकारी व उपवनसंरक्षक यांनी त्यांचा त्यांचा हिस्सा निश्चित करून एकत्रित कर वसूली यंत्रणा उभी करावी असे मा.अध्यक्षांनी सूचित केले.

कमिटीकडे पोलो ग्राऊंडचा विषय असल्याचे उपवनसंरक्षक यांनी मुद्दा मांडला. त्यावर सदस्य सचिव यांनी जिल्हा प्रशासनामार्फत प्रदर्शनी पोलो खेळासाठी पोलो ग्राऊंड उपलब्ध करणेकामी मा.संचालक, नगर रचना यांनी हेरिटेज नियमावलीतील प्राप्त अधिकारात काही अटीवर मान्यता दिल्याचे बैठकीत सांगीतले. बैठकीत पोलो ग्राऊंड अनुषंगाने चर्चा होऊन हे मैदान पोलो खेळासाठी उपयुक्त नसून त्यास असणारा पोहोच रस्ता अरूंद आहे व लगत झाडीमुळे त्याचे रूंदीकरणावर देखील मर्यादा आहे. या सर्व बाबींचा विचार करून सदर मैदान महाबळेश्वर शहरातील नागरिकांना अन्य खेळासाठी उपलब्ध करून दिल्यास अधिक उचित होईल असे काही सदस्यांनी मत मांडले.सदर विषय अजेंडयावर नसल्याने त्याबाबत पुढील बैठकीत निर्णय घेता येईल, असे मा. अध्यक्ष यांनी सांगीतले.

महाबळेश्वर पांचगणी प्रदेश हा हिरवाई (Greenery) साठी प्रसिध्द असून येथे दिवसेंदिवस वाढत असलेली इमारतींची संख्या यासह अन्य कारणांमुळे हिरवाई कमी होत चालली आहे असा उपवनसंरक्षक यांनी मुद्दा मांडला. महाबळेश्वर येथे जाणारा रस्ता अरूंद असून त्याचा रूंदीकरण प्रस्ताव करणे आवश्यक आहे, विशेषत: पांचगणी येथील बायपास रस्ता रूंदीकरण प्रस्ताव अग्रक्रमाने घेणेबाबत मा.अध्यक्ष यांनी बैठकीत सूचना मांडली. पर्यावरण दृष्टया संवेदनशील प्रदेशात जाहीरात बोर्ड किती आकाराचे व कोठे बसवावेत याबाबत चर्चा झाली. जाहिरात फलकासाठी कलरकोड देखील निश्चित करणे आवश्यक असल्याचे तसेच स्काय लाईन कट न होता ते लावण्याची आवश्यकता असल्याबाबत चर्चा झाली. सदर बाबत पुढील बैठकीत निर्णय घेता येईल, असे मा. अध्यक्षांनी सांगीतले.

कमिटीकडे विकास परवानगीसाठी प्राप्त होणारे प्रस्ताव सदस्यांना बैठकीपूर्वी किमान १५ दिवस अगोदर उपलब्ध करून देण्याबाबत कॉन्झरवेशन आर्किटेक्ट श्रीमती लाटकर यांनी सूचना मांडली. बैठकीत प्रस्तावाचे सादरीकरण संबंधित मुख्याधिकारी यांनी वास्तुविशारदामार्फत करून त्यावर समितीने निर्णय घ्यावा, असे ठरले. कमिटीकडे चार प्रस्ताव येण्यासाठी तयार असून ते विहीत करून दिलेल्या नमुना प्रपत्रानुसार कार्यवाहीसह बैठकीपुढे सादरीकरण होणे आवश्यक असल्याची बाब सदस्य सचिवांनी निदर्शनास आणली.यानुसार नगर परिषदांनी प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यास अध्यक्षांनी मान्यता दिली.

सदस्य सचिव यांनी बॉम्बे इन्हार्मेंटल ग्रुपकडून हेरिटेज कमिटीस प्राप्त निवेदन बैठकीत वाचून दाखविले. सदर ग्रुपने पुढील बैठकीत सादरीकरण करणेस व त्यानुसार सदर ग्रुपला अवगत करण्यास मा.अध्यक्षांनी अनुमती दिली.

आसान डेव्हलपर्स ॲन्ड कंन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांच्याकडून महाबळेश्वर येथील "शिंदोळा पार्क" या हेरिटेज ग्रेड-१ मिळकती मधील अनाधिकृत बांधकामाबाबत कमिटीस प्राप्त तक्रार अर्ज सदस्य सचिव यांनी बैठकीत वाचून दाखविला. सदर ठिकाणच्या ग्रुप इमारतींना सन २००३ मध्ये नगर परिषदेने परवानगी दिली आहे.मात्र जागेवर बांधकाम करताना काही इमारतीत जादा बांधकामे झालेली आहेत. त्यामुळे नगर परिषदेने कलम ५२,५३ ची नोटीस बजावल्याचे व सदर मिळकतीमध्ये मालकी हक्कावरून वाद असल्याचे मुख्याधिकारी, महाबळेश्वर यांनी बैठकीत सांगीतले. याबाबत सविस्तर अहवाल पुढील बैठकीत ठेवण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी मुख्याधिकारी, महाबळेश्वर यांना सूचना दिल्या.

हेरिटेज कमिटी सदस्यांचे भत्त्याबाबत शासनाकडे संदर्भ केल्याचे पत्र सदस्य सचिव यांनी मा.अध्यक्ष यांच्या निदर्शनास आणून दिले. याबाबत शासनाच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्याचे ठरले.

बैठकीच्या शेवटी मा. अध्यक्षांनी अध्यक्षीय भाषणात सर्व सदस्यांचे कमिटीमधील निवडीबाबत अभिनंदन केले. महाबळेश्वर पांचगणी प्रदेश फार महत्वाचा असून याठिकाणी जागतिक दर्जाचे हिल स्टेशन असल्या कारणाने जगभरातून वाढत्या संख्येने पर्यटक याठिकाणी येत असतात. यासाठी महाबळेश्वरला जाणा-या रस्त्याचे रूंदीकरण तसेच ठिकठिकाणी वाहनतळांची सोय करणे आवश्यक असल्याचे सांगीतले. पांचगणीतून जाणारा बायपास रस्ता अरूंद आहे. त्याचे रूंदीकरण आवश्यक असल्याचे सांगीतले. हेरिटेज कमिटीचे कामकाज पूर्णपणे पारदर्शक, विहीत नियमावलीनुसार व नागरिकांना सुसहय होईल अशा पध्दतीने करण्याचा मानस मा.अध्यक्षांनी व्यक्त केला.

मा. अध्यक्षांच्या मान्यतेने कमिटीची पुढील बैठक दि. ३.९.२०१६ रोजी सातारा येथे घेण्याचे निश्चित होऊन व उपस्थितांचे आभार मानून बैठकीचे कामकाज संपले.

**सही/*****
**(श्रीकांत देशमुख)**
**सदस्य सचिव,**
हेरिटेज कॉन्झर्वेशन कमिटी तथा
सहायक संचालक, नगर रचना, सातारा.

**सही/*****
**(दिलीप बंड)**
**अध्यक्ष,**
हेरिटेज कॉन्झर्वेशन कमिटी

**सातारा , वाई, पांचगणी, महाबळेश्वर नगर परिषद व महाबळेश्वर-पांचगणी प्रादेशिक योजना**
**हेरिटेज कॉन्झरर्वेशन कमिटी समोर नगर परिषद / नियोजन प्राधिकरण यांनी सादर करावयाचे प्रस्तावांचे छाननी प्रपत्र**

| अ.क्र. | बाब | नियोजन प्राधिकरणाचा शेरा |
|---|---|---|
| १ | हेरिटेज स्थळाचे नांव | |
| २ | मंजूर नियमावलीतील ग्रेड | |
| ३ | हेरिटेज स्थळांचे स्थानिक महत्व व वैशिष्ठे (रंगीत छायाचित्रांसह व अद्यावत गुगल इमेज) | |
| ४ | नियमावलीनुसार अनुज्ञेय विकास/ बदल | |
| ५ | हेरिटेज मिळकतीबाबत प्रस्तावित विकासाचा संक्षिप्त तपशील | |
| ६ | प्रस्तावित वाढीव बांधकाम / बदल हेरिटेज नियमावली नुसार अनुज्ञेय आहे अगर कसे ? | |
| 7 | नगर रचना / नगर परिषदेकडील प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीनुसार प्राथमिक शिफारस | |
| ८ | नियोजन प्राधिकरणाच्या मते कोणते नियम/ निकष लागू करावेत याबाबत टिपण | |
| ९ | प्रस्तुत विकास परवानगी देताना प्रचलित नियमावलीतील कोणत्या नियमात सवलत अपेक्षित आहे काय? | |
| १० | संबंधित वास्तु विशारद यांनी समितीसमोर करावयाचे सादरीकरण तयार केले आहे का? | होय / नाही. |
| ११ | समितीचा निर्णय | |

"सातारा,वाई,पांचगणी व महाबळेश्वर नगरपरिषद तसेच महाबळेश्वर-पांचगणी प्रदेश"याकरिता

**हेरिटेज कॉन्झर्वेशन कमिटी**

नियोजन भवन, सातारा येथे दि. ५.१०.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या बैठकीचे

# -: इतिवृत्त :-

मा. अध्यक्ष, श्री. दिलीप बंड यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या हेरिटेज कॉन्झर्वेशन कमिटीच्या दुसऱ्या बैठकीस मा. जिल्हाधिकारी, सातारा यांचेसह एकूण ८ सदस्य, विशेष निमंत्रित, उपवनसंरक्षक, सातारा, अधिक्षक, भूमि अभिलेख, सातारा व नगर परिषदांचे मुख्याधिकारी उपस्थित होते.

सदस्य सचिव यांनी बैठकीची विषय सूची विषद केली व त्यास अनुसरुन मा. अध्यक्षांचे अनुमतीने कामकाज चालू करण्यात आले.

**१) मागील बैठकीचे इतिवृत्त कायम करणे :**

कमिटी सदस्य श्रीमती लाटकर यांच्या सूचनेनुसार विकास योजना नकाशावर हेरिटेज मिळकती दर्शवून घेऊन असा नकाशा नगर परिषदेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेबाबत चर्चा झाली होती. तथापि, सदर विषय पूर्वीच्या इतिवृत्तात चुकून आला नव्हता. मात्र चर्चेप्रमाणे शाखा कार्यालयामार्फत महाबळेश्वर व पांचगणी नगर परिषद हद्दीतील शासनाने अंतीम केलेल्या हेरिटेज यादीनुसार मिळकती नकाशावर स्थूलमानाने दर्शवून घेण्यात आल्याचे व असे नकाशे मुख्याधिकारी, महाबळेश्वर व पांचगणी यांना पुरविण्यात येत असल्याचे सदस्य सचिव यांनी बैठकीत सांगीतले. तसेच सदर नकाशे मोजणी नकाशे, सिटी सर्व्हे नकाशे, मंजूर हेरिटेज नियमावली इ.आधारे तपासून व तसे प्रमाणित करून संबंधित मुख्याधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी, असे अवगत केले.

बैठकीत सदस्यांनी सुचविलेल्या सूचना नावासह येणे आवश्यक असल्याबाबत संवर्धन वास्तुविशारद श्रीमती लाटकर व डॉ.जय सामंत यांनी सुचविले.इतिवृत्त थोडक्यात लिहीण्याच्या अटीसापेक्ष त्यास अध्यक्षांनी मान्यता दिली, व मागील बैठकीचे इतिवृत्त कायम करण्यात आले.

**२) सातारा नगर परिषद हद्दीतील हेरिटेज मिळकती :**

विषय सुचीनुसार, सातारा नगर परिषद क्षेत्रातील मुख्याधिकारी यांनी अंतिम केलेल्या ३८ वारसा स्थळांचे सादरीकरण नगर रचनाकार श्री. चव्हाण यांनी केले.

समिती सदस्य श्री. सहस्त्रबुध्दे (संवर्धन वास्तुविशारद) यांनी प्राथमिक १४९ वारसास्थळांपैकी ३८ वारसा स्थळे कशा रितीने अंतिम करण्यात आली याची विचारणा करुन सर्व १४९ वारसा स्थळांची यादी, सदस्यांना नकाशासह उपलब्ध करुन देण्याबाबत सूचित केले. नगर परिषदेचे नगर रचनाकार यांनी सातारा शहरातील स्थापत्यविषयक, ऐतिहासिक, सांस्कृतिक महत्व, डिझाईन तसेच निर्माण कालावधी इ.विचारात घेऊन, निवडलेल्या वारसा स्थळांचे मंजूर हेरिटेज नियमावलीत विहीत केलेली वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन यादी अंतिम करण्यात आल्याचे बैठकीत सांगीतले. सादरीकरणातील मिळकती कोणाच्या मालकीच्या आहेत, खाजगी मालमत्ता असेल तर त्या जागा मालकाचे काय म्हणणे आहे याबाबत अध्यक्षांनी विचारणा केली. अंतीम करण्यात आलेल्या ३८ वारसा स्थळांबाबत सुनावणी झाली आहे व त्यापैकी १५ मिळकतधारकांनी मा.संचालक, नगर रचना यांचेकडे अपीले दाखल केली असून त्यावर कार्यवाही सुरू असल्याचे सांगीतले. ३८ मिळकतीवर निर्णय झाला असल्याने त्या आहे तशाच राहतील असे अध्यक्ष यांनी सांगीतले. ३८ वारसा स्थळांची यादी रितसर अंतीम झाली असल्याने, इतर शहरातील स्थळे निश्चित करताना निकष ठरवून लावता येतील असे समिती सदस्य सहसंचालक, नगर रचना यांनी सांगीतले. सदर सविस्तर चर्चेअंती नगर परिषदेमार्फत १४९ वारसा स्थळांची यादी व नकाशा सदस्यांना पुढील बैठकीपूर्वी उपलब्ध करुन देण्याबाबत अध्यक्षांनी सूचना दिल्या.

वारसा स्थळे निश्चित करताना बांधकामाच्या वर्षाचा निकष होऊ शकत नाही, असे सदस्य श्री रानडे यांनी सांगितले. नवीन यादी करताना हेरिटेज मिळकतींच्या समावेशाबाबत निकष ठरावावेत, त्याचा मसूदा तयार करण्यात यावा असे सदस्य श्री.सहस्त्रबुध्दे यांनी सांगितले. ग्रेड १, ग्रेड २ बाबत मार्गदर्शक तत्वे (Guideline) ठरविणे आवश्यक आहे तसेच बेस स्ट्रक्चर, मार्किंग सिस्टीम, कॉमन वेटेज, कव्हरेज याबाबत श्री रानडे यांनी निकष ठरविणेस सांगीतले. त्यावर माहिती/सूचना द्याव्यात. तसेच रंगनाथन समितीने काही निकष ठरविले होते का हे पाहून, निश्चित केलेल्या निकषांना जिल्हाधिकारी व नगर रचना संचालनालयाची मान्यता घेऊ. तसेच त्या अनुषंगाने प्रत्येक स्थळांचे निरीक्षण व इतर बाबी विचारात घेण्याबाबत श्री. रानडे यांनी पुढाकार घ्यावा व याकामी आवश्यकतेनुसार श्रीमती लाटकर तसेच BEAG तर्फे श्रीमती हेमा रमाणी यांचे सहाय्य घेण्यात यावे, असे अध्यक्ष यांनी प्रतिपादन केले.

**३) समितीकडे प्रस्ताव सादरीकरणाबाबत** :

सदर बैठकीत पांचगणी नगर परिषदेमार्फत तसेच काही संस्थाकडून समिती सदस्यांकडे हेरिटेज स्थळांचे दुरूस्तीच्या संचिका परस्पर पाठविण्यात आल्याची बाब निदर्शनास आली. यावर अध्यक्ष, जिल्हाधिकारी, सातारा यांचेसह उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांनी बैठकीत तीव्र नाराजी व्यक्त केली. यावर बैठकीत सविस्तर चर्चा होऊन हेरिटेज कमिटीकडे प्रकरणे पाठविताना ती समितीचे सदस्य सचिव यांच्या मार्फतच पाठविली जावीत. तसेच अशा प्रत्येक प्रकरणाबाबत मुख्याधिकारी यांनी संबंधित वारसा स्थळाबाबत सविस्तर टिपण्णी स्पष्ट अभिप्रायासह सादर करणेबाबत अध्यक्ष यांनी सूचना दिल्या. मुख्याधिकारी यांनी अशी टिपणी सादर करताना त्यामध्ये संबंधित वास्तु /परिसर वारसा स्थळ म्हणून निवड करण्यामागील संक्षिप्त पार्श्वभूमि, बांधकाम वर्ष, त्याची सध्याची स्थिती व दुरूस्तीची आवश्यकता, विकास योजना प्रस्ताव, हेरिटेज नियमावलीनुसार वारसा स्थळाचे ग्रेडनुसार विकासास वाव (Scope) व सादर प्रस्तावाची अनुज्ञेयता इ. बाबतीत सविस्तर छाननी करून आपल्या स्पष्ट अभिप्रायासह प्रकरणे हार्ड व सॉफट कॉपी स्वरूपात बैठकीच्या किमान १५ दिवस अगोदर सादर करावीत जेणेकरून या कार्यालयास अशा प्रस्तावांची तांत्रिक पडताळणी करून आगामी बैठकीपूर्वी त्यास समिती सदस्यांना उपलब्ध करून देणे शक्य होईल असे सदस्य सचिव यांनी सुचविले.

**४) बॉम्बे एन्व्हार्मेंटल ॲक्शन ग्रुपने उपस्थित केलेल्या मुद्दयांवरील चर्चा** :

**अ) हेरिटेज नियमावलीतील दुरूस्त्यांबाबत** :

वारसा स्थळांची नियमावली व यादीबाबतची दुरूस्ती नगर परिषदेऐवजी शासनामार्फत करणेबाबत सूचित करुन सातारा, वाई, पांचगणी व महाबळेश्वर नगर परिषदांच्या नियमावलीतील तरतुदीत तफावती आहेत, तथापि, सर्वच हेरिटेज नियमावलीमध्ये एकसारखेपणा आवश्यक असल्याचे उक्त ग्रुपच्या श्रीमती हेमा रमाणी यांनी प्रतिपादन केले. शासनाने अंतीम केलेल्या नियमावलीतील दुरूस्त्यांबाबतची प्रक्रिया दिर्घ कालावधीची असल्याने व या बाबींचा विचार हेरिटेज कमिटी करू शकेल असे सदस्य सहसंचालक, नगर रचना यांनी प्रतिपादन केले. त्यावर अध्यक्ष यांनी चारही नगर परिषदांच्या नियमावलीत एकसारखेपणाबाबत कमिटीमार्फत आवश्यक दुरूस्त्यासाठी नगर परिषदांना निदेश देऊ, व त्या शासनाकडे पाठवू असे सूचित केले. अध्यक्ष यांनी शासकीय इमारतींसह सर्वच संबंधित वारसा स्थळांची निवड, वर्गीकरण (Gradation) काळजीपूर्वक ठरविले जावे. जेणेकरून अशा इमारतींची भविष्यातील दुरूस्ती/देखभाल/ पुर्नबांधणी शक्य होईल, अशा सूचना दिल्या.

**ब) सातारा नगर परिषद क्षेत्रातील अंतिम वारसा स्थळांचे यादीत वाढ करणे** :

सातारा हेरिटेज यादीत यापूर्वी कळविलेल्या काही स्थळांचा समावेश करायला हवा असे सुचविले. त्यावेळी अध्यक्षांनी शासकीय इमारती तथा अन्य मिळकती अनावश्यकपणे हेरिटेज यादीत घ्यायला नकोत असे सांगीतले. त्यावेळी डॉ. जय सामंत यांनी चर्चेत भाग घेताना वारसा स्थळाची निवड करताना निश्चित व सर्वकष असे निकष हवेत असे सुचविले. चर्चेअंती बॉम्बे ॲक्शन ग्रुपची यादी सातारा नगर परिषदेकडे पाठविणेचे ठरले.

**क)  पांचगणी येथील टेबल लॅन्ड मधील विकास परवानगीबाबत :**

मा.उच्च न्यायालयाने उपरोक्त टेबल लँन्डच्या आराखडयास मान्यता दिलेली होती. पांचगणी नगर परिषदेने हेरिटेज कमिटी अस्तित्वात नसताना, फेब्रुवारी, २०१५ मध्ये आराखडे मंजूरीसाठी सादर केलेले होते. सदर आराखडयामध्ये लाभधारक यांनी मान्य केलेल्या बाबी व मा.उच्च न्यायालयात सादर केलेल्या बाबीत तफावत असल्याचे श्रीमती रमाणी यांनी बैठकीच्या निदर्शनास आणून दिले व लाभार्थींनी प्रारंभी मान्य केल्यानुसार आराखडे असलेबाबत हेरिटेज कमिटीने खातरजमा करावी, असे सूचविले.

त्यावेळी सदस्य सचिव यांनी पांचगणी नगर परिषदेकडून प्राप्त प्रस्तावावर नगर रचना संचालनालयाचे मार्गदर्शन अपेक्षिले होते. तसेच पांचगणी नगर परिषदेने दि.५.६.२०१२ रोजी प्रसिध्द केल्या ई.पी. मध्ये "Table land to be developed as per the guidelines of Hon'ble High Court" अशी तरतूद प्रस्तावित करण्यात आली होती. ती शासनाने अंतीमतः मंजूर केलेली आहे. त्यानुसार दि.१.१०.२०१६ रोजीच्या पत्रासोबत बॉम्बे एन्व्हार्मेंटल ग्रुपकडील प्राप्त निवेदन मुख्याधिकारी, पांचगणी यांचेकडे पाठवून मा. उच्च न्यायालयाने मान्य केलेल्या सर्व बाबी नकाशावर आल्याची खात्री करावी व असे दुरूस्त नकाशे हेरिटेज कॉन्झर्वेशन कमिटीसमोर सादर करण्यास नगर परिषदेस कळविल्याचे बैठकीत सांगीतले.

यावेळी अध्यक्ष यांनी मा.उच्च न्यायालयाने ३० स्टॉलना मान्यता दिली असताना नकाशामध्ये ३१ स्टॉल कसे झाले याबाबत विचारणा करून मा.उच्च न्यायालयाचे आदेश अंतीम असून त्यानुसार नगर परिषदेने खातरजमा करुन आराखडे मंजुरीकरिता सादर करणेबाबत सूचना दिल्या.

**ड)  नैसर्गिक वारसा स्थळांच्या ठिकाणचा अनाधिकृत विकास व सिमांकनाबाबत**

यानंतर केंद्र शासनाने जाहीर केलेला इको सेन्सेटिव्ह झोन, वारसा स्थळांबाबत दिलेल्या सूचना, मंजूर हेरिटेज नियमावली तसेच महाबळेश्वर पांचगणी प्रदेशातील ओढे, नाले, तलाव, धबधबेंच्या उगमापासून विवक्षित अंतरात विकास अनुज्ञेय न करणे इ. बाबतच्या तरतूदी विचारात घेऊन, विकास अपेक्षित असल्याचे श्रीमती रमाणी म्हणाल्या. लिंगमळा येथील स्मशानभूमि बांधकाम, कॅनॉट पिक येथील वॉच टॉवर, वेण्णालेक येथील स्टॉल्स इ.बाबी तसेच विविध पॉईंट जवळील इतर अनाधिकृत घडामोडी घडत असल्याचे फोटोग्राफसह त्यांनी बैठकीच्या निदर्शनास आणले. सदर नैसर्गिक वारसा स्थळांचे ठिकाणी झालेल्या अनाधिकृत विकासाचे बाबतीत महाबळेश्वर नगर परिषद हद्दीत मुख्याधिकारी यांनी व प्रादेशिक योजना क्षेत्रात सहायक संचालक, नगर रचना, सातारा यांनी पाहणी करून अहवाल सादर करणेबाबत व आवश्यकतेनुसार पाडणेबाबत/ काढून टाकणेबाबत जिल्हाधिकारी, सातारा यांनी संबंधितांना सूचना दिल्या.त्यावेळी समिती सदस्य सहसंचालक, नगर रचना यांनी सर्व वारसा स्थळांच्या हद्दी मोजणी नकाशानुसार निश्चित व्हायला हव्यात व यासाठी नियमपण असायला हवेत असे विषद केले. नैसर्गिक वारसा स्थळांचे सिमांकनाबाबत मालकी हक्कानुसार ज्या त्या विभागामार्फत सिमांकन करतेवेळी मोजणी खात्यामार्फत आवश्यक तेथे सहकार्य केले जाईल, असे अधिक्षक, भूमि अभिलेख, सातारा यांनी बैठकीत सांगीतले. नैसर्गिक वारसा स्थळांचे ठिकाणी व परिसरात बांधकामे हाती घेताना पूर्वमान्यता घेणेबाबत सर्व विभागांना सूचना देण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगीतले.

नैसर्गिक वारसा स्थळांपैकी महाबळेश्वर येथील वेण्णालेकसाठी २८ हे. क्षेत्र वन खात्याने जीवन प्राधीकरणास तलावासाठी वर्ग केले असल्याचे व यामधील स्टॉलना सन १९८२ मध्ये मान्यता दिल्याचे उपवनसंरक्षक, सातारा यांनी बैठकीत सांगीतले. यावेळी सदस्य श्रीमती लाटकर यांनी वेण्णालेकचा कोअर व बफर झोन निश्चित करायला हवा, असे सूचविले. मा.जिल्हाधिकारी यांनी वेण्णालेकचे क्षेत्र सिमांकनासह निश्चित करायला हवे अशी सूचना मांडली. याचे सिमांकन करावयाचे झाल्यास आम्ही सहकार्य करू असे अधिक्षक, भूमि अभिलेख यानी सांगीतले.

**ई)  महाबळेश्वर येथील पोलो ग्राऊंड विकासाबाबत :-**

बॉम्बे एन्व्हार्मेंटल ॲक्शन ग्रुपमार्फत घेण्यात आलेल्या आक्षेपाबाबत बैठकीत चर्चा झाली. सदर ग्रुपने पोलो ग्राऊंडचे ३.६७ हे. क्षेत्र वन संरक्षक कायदयाअंतर्गत रूपांतरीत करण्याचा प्रस्ताव जिल्हा क्रिडा अधिकारी,सातारा

यांचेमार्फत मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांचेकडे चुकीचा सादर झाला आहे. सदर साईट ही ग्रेड-१, इको सेन्सेटिव्ह झोनमधील असल्याने, सदर प्रस्ताव हेरिटेज समितीसमोर चर्चेला आल्यास तो नामंजूर करावा असे श्रीमती रमाणी यांनी सांगीतले. सदस्य सचिव यांनी या चर्चेत भाग घेताना, हेरिटेज कमिटी अस्तित्वात नसल्याने, सदर प्रस्ताव नियमावलीतील तरतुदीनुसार मा. संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला होता. व त्यास त्यांनी दि.४/४/२०१६ रोजीच्या पत्राने मंजूरी दिल्याचे बैठकीत सांगीतले. त्यानंतर उपवनसंरक्षक यांनी प्रस्तावाची वस्तुस्थिती सांगून जागेतील दगड काढण्यास केंद्र शासनाने मान्यता नाकारली असल्याचे सांगीतले. यावर सविस्तर चर्चा होऊन पोलो ग्राऊंडचा हेरिटेज दर्जा, इको सेन्सेटिव्ह झोन व पायाभूत सुविधा करताना करावी लागणारी वृक्षतोड इ. बाबी विचारात घेता, मा.संचालक, नगर रचना यांचेकडे मान्यतेचे पुर्नविलोकन करणेबाबतचा प्रस्ताव कमिटीमार्फत पाठविणेचे ठरले.

**उ) महाबळेश्वर येथील खाईस्ट चर्च** :-

खाईस्ट चर्च आवारातील अनाधिकृत बांधकाम व पार्किंगचा मुद्दा श्रीमती हेमा रमाणी यांनी बैठकीत विषद केला. त्यावर सविस्तर चर्चा होऊन जागेचा मालकी हक्क न पाहता, महाबळेश्वर नगर परिषदेने त्याठिकाणी असणारे अनाधिकृत बांधकामाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ नुसार पूढील कार्यवाही करण्यात यावी, असे अध्यक्षांनी सांगीतले व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद यांनी पुढील बैठकीत सादर करणेबाबत जिल्हाधिकारी, सातारा यांनी मुख्याधिका-यांना सूचना दिल्या.

**४) महाबळेश्वर-पांचगणी प्रदेशातील टोल वसुली** :-

महाबळेश्वर परिसरात नगर परिषद व वन विभाग यांच्याकडून स्वतंत्र टोल वसूली केली जाते. याबाबत चर्चा होऊन पर्यटकांच्या सोयीच्या दृष्टीने दोघांनी आपआपला हिस्सा ठरवून घेऊन दोन्ही पावत्या एकत्रित दिल्या जाव्यात,असे अध्यक्ष यांनी बैठकीत सांगीतले. त्यानुसार कार्यवाही करण्याचे उपवनसंरक्षक व मुख्याधिकारी यांनी मान्य केले.

**५) राष्ट्रीय लेक संवर्धन योजना** (NLCP) :-

या योजनेअंतर्गत वेण्णालेक संवर्धनासंबधातील एनविक्लिन असोशिएटस, कोल्हापूर यांच्यामार्फत हेरिटेज बैठकीत सादरीकरण करण्यात आले व वेण्णालेक संवर्धनाबाबतची पुस्तिका सर्व सदस्यांना उपलब्ध करून देण्यात आली. सदर योजना केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानातून कार्यान्वित करण्यात येणार असल्याची बाब विचारात घेता, सदर योजनेस प्राथमिक मान्यता देण्यात येत असल्याचे व वेण्णालेक संवर्धनाबाबतचा प्रारूप आराखडा (DPR) तयार करून तो अंतीम मान्यतेसाठी हेरिटेज कमिटीसमोर सादर करण्याबाबत अध्यक्ष यांनी संबंधितांना सूचना दिल्या.

**६) महाबळेश्वर नगर परिषद हद्दीतील प्रस्तावांचे सादरीकरण** :-

अ) महाबळेश्वर नगरपरिषदेमार्फत आलेल्या प्रस्तावातील बॅबिंग्टन हाऊस व महाबळेश्वर क्लब या ग्रेड-१ मधील हेरिटेज मिळकतींचे दुरूस्ती व पुर्नबांधणी (Repairs & Restoration) बाबतचे सादरीकरण BRIC फर्मचे संवर्धन वास्तुविशारद श्री ब्रिजेश सिन्हा व सोनल मुजुमदार यांच्यामार्फत करण्यात करण्यात येऊन त्यांनी या दोन्ही हेरिटेज मिळकती मध्ये प्रस्तावित विकासाचा सविस्तर आराखडा बैठकीस सांगीतला. त्यावेळी प्रस्तावाबाबत चर्चा होऊन सदर मिळकतींची ग्रेड व नियमावलीमधील तरतुदी विचारात घेऊन यासंदर्भात समिती सदस्य वास्तुविशारद श्रीमती लाटकर व सहस्त्रबुध्दे व स्ट्रक्चरल इंजिनिअर श्री रानडे यांनी जागा पाहणी करून, जागेवरील वस्तुस्थिती व सादर करण्यात आलेला दुरूस्तीचा प्रस्ताव या अनुषंगाने कमिटीस अहवाल सादर करणेबाबत अध्यक्षांनी सूचना दिल्या. त्यानुसार संबंधित सदस्यांनी सदर ठिकाणांची दि.२२.१०.२०१६ ही जागा पाहणीची तारीख निश्चित केली.

ब) यानंतर महाबळेश्वर येथील नॉन परेल व्हयू या ग्रेड-३ अंतर्गत हेरिटेज मिळकतीमधील माळी कॉटेज पुर्नबांधणी प्रस्तावाबाबत सादरीकरण संबंधितांकडून करण्यात आले. व याबाबतच्या संचिका सर्व सदस्यांना उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच महाबळेश्वर नगरपरिषदेकडून डॉ.साबणे रोडवरील स.नं.६/ब मधील बांधकाम

परवानगी संदर्भात मान्यतेसाठी प्राप्त प्रस्तावाबाबत चर्चा होऊन "बाजार" या ग्रेड -३ अंतर्गत पुर्नबांधणी करताना काय निकष असावेत याबाबत ढोबळमानाने चर्चा झाली. यासंदर्भाने वर नमूद तारखेस महाबळेश्वर येथील पाहणी करावयाचे इमारतीसह सदर इमारत व बाजाराची पहाणी करून व काही निकष ठरवून मान्यता देण्याचे ठरले

७) **पांचगणी नगर परिषद हद्दीतील प्रस्तावांचे सादरीकरण** :-

अ) स्वातंत्र दिन, प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिनास पांचगणी नगर परिषदेमार्फत ध्वजारोहन करण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी चौकातील लोखंडी ध्वजस्तंभाची पाईप गंजल्याने ती बदलणेचा विषय बैठकीत मांडण्यात आला. मुख्य बाजार हा हेरिटेज ग्रेड-१ मध्ये दर्शविला असून लोखंडी पाईप खराब होऊन झेंडावंदन करणेस धोकादायक झाल्याचे मुख्यधिकारी, नगरपरिषद यांनी बैठकीत सांगीतले. याबाबत सविस्तर चर्चा होऊन ध्वजस्तंभाच्या तळच्या चौथ-याचे डिझाईन कायम ठेऊन ध्वजस्तंभाचा पाईप बदलणे व आवश्यकतेनुसार त्याचे स्थान बदलणेसही कमिटीकडून मान्यता देण्यात आली.

ब) यानंतर पांचगणी येथील होमी व्हिला या हेरिटेज मिळकतीमधील वाढीव बांधकामानुषंगाने बैठकीत संबंधित वास्तुविशारद यांच्यामार्फत सादरीकरण करण्यात आले. सादरीकरणा दरम्यान संबंधित वास्तुविशारद यांनी इमारत हेरिटेज आहे. (ग्रेड २ बी) परंतु परिसर हेरिटेज नसल्याबाबत पांचगणी नगर परिषदेने कळविल्याचे बैठकीत सांगीतले. यावर नगर परिषदेने याचा खुलासा करणेबाबत, अध्यक्षांनी सूचना दिल्या, तद्नंतर सदर हेरिटेज इमारतीचे क्षेत्र साधारणतः २०० चौ.मी. असून, एकूण क्षेत्र १.०६ हे. असल्याचे व ग्रेड २ बी नुसार अनुज्ञेय विकास याबाबत सविस्तर चर्चा झाली. याबाबत समितीच्या वर नमूद सदस्यांनी जागा पाहणी करून त्याबाबतचा अहवाल कमिटी बैठकीपुढे आल्यानंतर मान्यतेबाबत निर्णय घेण्याचे ठरले.

८) **इतर मुद्दे** :-

सदस्य श्रीमती लाटकर यांनी वारसा स्थळांच्या दुरूस्ती /पुर्नबांधणी प्रस्तावासाठीचे छाननी प्रपत्र अंतिम करणेबाबत सूचना केली. सदस्य सचिव यांनी सदस्य डॉ.जय सामंत यांचेकडून वाढीव छाननी मुद्दे प्राप्त झाले असून त्यानुसार सुधारित छाननी प्रपत्र तयार करण्याचे दृष्टीने सर्व सदस्यांनी आपल्या सूचना/मुद्दे सदस्य सचिव यांचेकडे पाठवावेत व ते विचारात घेऊन सुधारित प्रपत्र पुढील बैठकीत कायम करणे योग्य होईल असे सर्वानुमते ठरले.

आयत्या वेळच्या विषयात, श्रीमंत छत्रपती शिवाजीराजे भोसले यांनी "सातारा येथील नविन/ जुना राजवाडा मुळ मिळकतधारक यांच्या ताब्यात दिला गेल्यास, त्याची देखभाल/दुरुस्ती हेरिटेज कमिटीच्या मार्गदर्शनानुसार स्वखर्चातून करू" अशा आशयाचे निवेदन सदस्य डॉ. शिवाजीराव चव्हाण यांनी बैठकीत वाचून दाखविले. त्यावर चर्चा होऊन ९९ वर्षाचा करार संपल्यानंतर हस्तांतरणाचा विषय पूर्णतः जिल्हाधिकारी, सातारा यांचेशी संबंधित असून तो हेरिटेज कमिटीच्या अखत्यारित येत नसल्याचे अध्यक्ष यांनी सांगीतले.

कमिटीच्या पुढील बैठका प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी घेणेबाबत काही सदस्यांनी सूचना मांडली. त्यास मा.अध्यक्षांनी मान्यता दिली. पुढील बैठक दि. ५/११/२०१६ रोजी महाबळेश्वर येथे घेण्याचे निश्चित होऊन व उपस्थितांचे आभार मानून बैठकीचे कामकाज संपले.

सही/***
(श्रीकांत देशमुख)
**सदस्य सचिव**,
हेरिटेज कॉन्झरर्वेशन कमिटी तथा,
सहायक संचालक, नगर रचना, सातारा.

सही/***
(दिलीप बंड)
**अध्यक्ष**,
हेरिटेज कॉन्झरर्वेशन कमिटी,
महाबळेश्वर, पांचगणी, वाई सातारा नगर परिषद
व महाबळेश्वर पांचगणी प्रदेश

**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग,**
**सातारा शाखा.**

जा.क्र.हेरिटेज समिती/बैठक इतिवृत्त/ससंसा/**३३६४**

जिल्हा परिषद विस्तारीत इमारत,
दुरध्वनी क्र. ०२१६२ / २३९२४१
इमेल :-adtpsatara@rediffmail.com
सातारा दि.**१४** /१०/२०१६.

प्रति,

१) श्री. दिलीप बंड, (निवृत्त आय.ए.एस.), **मा.अध्यक्ष**, हेरिटेज कॉन्झर्वेशन कमिटी
**मा.सदस्य** :
२) मा.जिल्हाधिकारी, सातारा.
३) श्री.रवि रानडे, स्ट्रक्चरल इंजिनिअर
४) श्री. अच्युत वाटवे, स्ट्रक्चरल इंजिनिअर
५) आर्किटेक्ट श्री.चेतन सहस्त्रबुध्दे
६) आर्किटेक्ट श्रीमती वैशाली प्रसाद लाटकर
७) प्रा.जय सामंत
८) डॉ.शिवाजीराव काशीनाथ चव्हाण
९) सहायक संचालक, पुरातत्व विभाग,येरवडा, पुणे
१०) मा.अधिक्षक, पुरातत्व विभाग,मुंबई सर्कल.
११) मा.सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे
**विशेष निमंत्रित** :
१२) मा.उपवनसंरक्षक, सातारा
१३) मा.अधिक्षक, भुमि अभिलेख, सातारा.

**विषय :- सातारा, वाई, पाचगणी, महाबळेश्वर नगर परिषदा तसेच प्रादेशिक योजना महाबळेश्वर-पाचगणी क्षेत्राकरिताचे हेरिटेज कॉन्झर्वेशन समितीच्या दुस-या बैठकीचे इतिवृत्त.**

**संदर्भ :-** हेरिटेज कॉन्झर्वेशन कमिटीची दि.०५.१०.२०१६ रोजी संपन्न झालेली दुसरी बैठक.

महोदय,

नियोजन भवन, सातारा येथे दि.०५.१०.२०१६ रोजी संपन्न झालेल्या हेरिटेज कॉन्झर्वेशन कमिटीच्या दुस-या बैठकीचे इतिवृत्त सोबत पाठविण्यात येत आहे.

आपला,

सही/***
(**श्रीकांत देशमुख**)
**सदस्य सचिव**,
हेरिटेज कॉन्झर्वेशन समिती, तथा
सहायक संचालक, नगर रचना,
सातारा.

**प्रत** : १) जिल्हा नगर पालिका प्रशासन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा. यांना माहितीसाठी
२) मुख्याधिकारी, नगर परिषद, सातारा/वाई/पांचगणी/ महाबळेश्वर यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

## नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग,
## सातारा शाखा.

जा.क्र.वारसा स्थळ जतन समिती/तिसरी बैठक इतिवृत्त/ससंसा/४१०९

जिल्हा परिषद विस्तारीत इमारत,
दुरध्वनी क्र. ०२१६२ / २३९२४१
इमेल adtpsatara@rediffmail.com
सातारा दि. १९/१२/२०१६.

प्रति,

१) श्री. दिलीप बंड, (निवृत्त आय.ए.एस.), **मा.अध्यक्ष,** वारसा स्थळ जतन समिती

**मा.सदस्य :**

२) मा.जिल्हाधिकारी, सातारा.
३) श्री.रवि रानडे, स्ट्रक्चरल इंजिनिअर
४) श्री. अच्युत वाटवे, स्ट्रक्चरल इंजिनिअर
५) आर्किटेक्ट श्री.चेतन सहस्त्रबुध्दे
६) आर्किटेक्ट श्रीमती वैशाली प्रसाद लाटकर
७) डॉ.जय शा.सामंत
८) डॉ.शिवाजीराव काशीनाथ चव्हाण
९) सहायक संचालक, पुरातत्व विभाग,येरवडा, पुणे
१०) मा.अधिक्षक, पुरातत्वविद, भारतीय पुरातत्व संरक्षण, मुंबई सर्कल.
११) मा.सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे

**विशेष निमंत्रित :**

१२) मा.उपवनसंरक्षक, सातारा

विषय :- **सातारा, वाई, पाचगणी, महाबळेश्वर नगर परिषदा तसेच प्रादेशिक योजना महाबळेश्वर-पाचगणी क्षेत्राकरिताचे वारसा स्थळ जतन समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.**

**संदर्भ** :- वारसा स्थळ जतन समितीची दि.७.१२.२०१६ रोजी संपन्न झालेली तिसरी बैठक.

महोदय,

दरबार भवन, राजभवन, महाबळेश्वर येथे दि.७.१२.२०१६ रोजी संपन्न झालेल्या वारसा स्थळ जतन समितीच्या तिस-या बैठकीचे इतिवृत्त सोबत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात येत आहेत.

आपला,

**सही/*****
**(श्रीकांत देशमुख)**
**सदस्य सचिव,**
वारसा स्थळ जतन समिती, तथा
सहायक संचालक, नगर रचना,
सातारा.

**प्रत :** १) जिल्हा नगर पालिका प्रशासन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा. यांना माहितीसाठी
२) मुख्याधिकारी, नगर परिषद, सातारा/वाई/पांचगणी/ महाबळेश्वर यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

"सातारा, वाई, पांचगणी व महाबळेश्वर नगर परिषद तसेच प्रादेशिक योजना, महाबळेश्वर पांचगणी क्षेत्र" याकरिता

वारसास्थळ जतन समिती

राजभवन, महाबळेश्वर येथे दि. ७.१२.२०१६ रोजी दुपारी २.०० वाजता संपन्न झालेल्या

## बैठकीचे इतिवृत्त

"सातारा, वाई, पांचगणी व महाबळेश्वर नगर परिषद तसेच प्रादेशिक योजना, महाबळेश्वर पांचगणी क्षेत्र"याकरिता वारसास्थळ जतन समितीची तिसरी बैठक मा. दिलीप बंड (Retired I.A.S.) यांच्या अध्यक्षतेखाली दि. ७/१२/२०१६ रोजी दुपारी २.०० वाजता दरबार हॉल, राजभवन, महाबळेश्वर येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस वारसास्थळ जतन समितीचे खालील मा. सदस्य व निमंत्रित सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | पदाधिकारी | पद |
|---|---|---|
| १ | मा. दिलीप बंड (Retired I.A.S.) | अध्यक्ष |
| २ | मा. प्र. जिल्हाधिकारी, सातारा | सदस्य |
| ३ | श्री. रवी रानडे, | सदस्य |
| ४ | डॉ. श्री. जयशा. सामंत | सदस्य |
| ५ | डॉ. श्री. शिवाजीराव का. चव्हाण | सदस्य |
| ६ | अधिक्षक पुरातत्वविद,भारतीय पुरातत्व सर्वेक्षण | सदस्य |
| ७ | उपवनसंरक्षक, सातारा वन विभाग, सातारा. | विशेष निमंत्रक |
| ८ | जिल्हा न.प.प्रशासन अधिकारी, सातारा | विशेष निमंत्रक |
| ९ | मुख्याधिकारी, सातारा नगर परिषद यांचे प्रतिनिधी | विशेष निमंत्रक |
| १० | मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद | विशेष निमंत्रक |
| ११ | मुख्याधिकारी, वाई नगर परिषद | विशेष निमंत्रक |
| १२ | मुख्याधिकारी, पाचगणी नगर परिषद यांचे प्रतिनिधी | विशेष निमंत्रक |
| १३ | सहायक संचालक, नगर रचना, सातारा | सदस्य सचिव |

सहायक संचालक, नगर रचना, सातारा तथा सदस्य सचिव,वारसा स्थळ जतन समिती यांनी मा. अध्यक्ष, मा. सदस्य तसेच उपस्थिताचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या अनुमतीने आवश्यक गणपुर्ततेच्या खातरजमेअंती बैठकीचे कामकाज सुरु केले. खालील विषयवार सादरीकरण व चर्चा होऊन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अक्र | विषय | निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | वारसास्थळ जतन समितीची दि. ५/१०/२०१६ रोजी संपन्न झालेल्या दुसऱ्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे. | वारसास्थळ जतन समितीच्या संपन्न झालेल्या दुसऱ्या बैठकीचे इतिवृत्ताबाबत कोणाचीही हरकत नसलेने बैठकीचे इतिवृत्त कायम करण्यास मान्यता देण्यात आली. | -- |
| २ | दुसऱ्या बैठकी नंतर आज-पर्यंत केलेल्या कार्य-वाहीस मान्यता देणे.<br>समितीची दुसरी बैठक अ.क्र.१ :- वारसा स्थळे यादी प्रसिध्द करणेबाबत | महाबळेश्वर न.प.च्या मंजुर वारसा स्थळांची यादी व नकाशा बेवसाईटवर प्रसिध्द करुन त्याचा अहवाल मुख्याधिकारी, नगर परिषद यांनी सादर केला असुन सदर पत्र समितीपुढे ठेवण्यात आले. पांचगणी नगर परिषद हद्दीतील वारसा स्थळांची यादी व नकाशा प्रसिध्द करणेबाबत मुख्याधिकारी, पांचगणी नगर परिषद यांना मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या. | मुख्याधिकारी, पाचगणी नगर परिषद |
| | समितीची दुसरी बैठक अ.क्र.२ :- सातारा नगर परिषद हद्दीतील हेरिटेज मिळकती | मागील बैठकीत सातारा नगर परिषदेने १४९ वारसा स्थळांची यादी व नकाशा सर्व सदस्यांना पुढील बैठकीपूर्वी उपलब्ध करुन देणेबाबत मा. अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.त्याप्रमाणे यादी उपलब्ध करुन दिली नसल्याचे बैठकीत निदर्शनास आले व ती पुरविण्याबाबत सातारा नगर परिषदेस सूचना देण्यात आली.समिती सदस्य श्री. रवि रानडे यांनी बैठकीच्या शेवटी ग्रेड १, ग्रेड २ अ, ब व ग्रेड ३ बाबत कसे निकष/गुणवत्ता असावी याबाबत सादरीकरण केले. | मुख्याधिकारी, सातारा नगर परिषद व सदस्य सचिव. |
| | समितीची दुसरी बैठक अ.क्र. ४ अ :- हेरिटेज नियमावली तील दुरुस्त्यांबाबत. | चारही नगर परिषदांच्या नियमावलीत एकसारखेपणा बाबत सर्व नगर परिषदांकडून दि.३०/११/२०१६ चे पत्र क्र. ३९०३ अन्वये अहवाल अपेक्षिला असल्याचे सदस्य सचिव यांनी सांगितले. सर्व नगर परिषदांनी याबाबतचा अहवाल पुढील बैठकीत सादर करण्याबाबत मा. अध्यक्ष यांनी सूचना दिल्या. | सर्व संबंधित मुख्याधिकारी |
| | समितीची दुसरी बैठक अ.क्र.४ बः- सातारा नगर परिषद क्षेत्रातील अंतिम वारसा स्थळांचे यादीत वाढ करणेबाबत. | बॉम्बे ॲक्शन ग्रुप, मुंबई यांनी समितीकडे सादर केलेली सातारा नगर परिषद क्षेत्रातील वाढीव वारसा स्थळांची यादी सदस्य सचिव यांनी मुख्याधिकारी, सातारा नगर परिषद यांचेकडे पाठवावी व याबाबतचा अहवाल पुढील बैठकीत सादर करण्याबाबत मा. अध्यक्ष यांनी सूचना दिल्या आहेत. | मुख्याधिकारी, सातारा नगर परिषद. |
| | समितीची दुसरी बैठक अ.क्र. ४ क :- पांचगणी येथील टेबल लॅण्ड विकास परवानगी बाबत. | बैठकीत दिलेल्या सूचनेनुसार मुख्याधिकारी, पांचगणी नगर परिषद यांनी पत्र क्र. ७६६, दि. २३/११/२०१६ अन्वये सुधारित नकाशे नगर रचना विभागास सादर केले असून नगर रचना विभागाने प्राप्त प्रस्तावाची छाननी | मुख्याधिकारी, पांचगणी नगर परिषद. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | करुन काही अटी व आवश्यक त्या दुरुस्त्या सुचवून पत्र क्र. ४००७, दि. ६/१२/२०१६ अन्वये तत्वतः मंजुरीची शिफारस केली आहे. नगर रचना विभागाने सुचविलेल्या दुरुस्तीनुसार दुरुस्त नकाशा समितीकडे सादर करण्याबाबत मुख्याधिकारी, पांचगणी नगर परिषद यांना मा. अध्यक्ष यांनी सूचना दिल्या. | |
| | | समितीची दुसरी बैठक अ.क्र. ४ ड :- नैसर्गिक वारसा स्थळांच्या ठिकाणचा अनधिकृत विकास व सिमांकनाबाबत. | महाबळेश्वर येथील व प्रदेशातील अनाधिकृत बांधकामाबाबत उपरोक्त ॲक्शन ग्रुपने लक्ष वेधले होते. याबाबत मागील बैठकीत चर्चा होऊन जागा पाहणीबाबत सुचना देण्यात आलेल्या होत्या. तथापि विधान परिषद / नगर परिषद निवडणुक जबाबदा-यामुळे मुख्याधिकारी / उपविभागीय अधिकारी यांची व्यस्तता विचारात घेऊन स्थळ निरिक्षण करण्यात आलेले नाही. याकामी स्थळ पाहणी करुन संबधितांनी आपला अहवाल पुढील बैठकीत ठेवणे आवश्यक आहे. | मुख्याधिकारी, महाबळेश्वर व पांचगणी नगर परिषद, सहायक संचालक, नगर रचना, सातारा, उपविभागीय अधिकारी, वाई तहसिलदार, महाबळेश्वर. |
| | | समितीची दुसरी बैठक अ.क्र.४ इ :- महाबळेश्वर येथील पोलो ग्राऊंड विकासा बाबत. | सदर पोलो ग्राऊंड विकासाच्या अनुषंगाने मागील बैठकीत चर्चा झाली असून, याबाबत पुनश्च एकवार श्रीमती हेमा रमाणी यांनी दि.०५/१२/२०१६ चे पत्रान्वये मुद्दा उपस्थित केला आहे. पोलो ग्राऊंडचा हेरिटेज दर्जा, इको सेन्सिटीव्ह झोन व पायाभुत सुविधा करताना करावी लागणारी वृक्षतोड इत्यादी बाबी विचारात घेता मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे दिलेल्या मान्यतेचे पुनर्विलोकन करण्या-बाबतचा प्रस्ताव समितीमार्फत पाठविण्याचे ठरले होते. त्यानुसार मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पाठवावयाचे पत्र मा. अध्यक्ष यांच्या स्वाक्षरीने निर्गमित करण्यात आले. | -- |
| | | समितीची दुसरी बैठक अ.क्र.४ उ :- महाबळेश्वर येथील खाईस्ट चर्च. | मागील बैठकीत सूचना दिल्यानुसार मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद यांनी खाईस्ट चर्च येथील अनाधिकृत बांधकामाबाबत संबधितांना नोटीस दिली होती. तथापि सदर मिळकतीवर मा. न्यायालयाने स्टे ऑर्डर दिली असल्याने फौजदारी गुन्हा दाखल करणेची कार्यवाही करता येत नसल्याचे मुख्याधिकारी यांनी सांगितले. तथापि मा. अध्यक्ष यांनी सदर प्रकरणी त्वरेने फौजदारी गुन्हा दाखल करणे आवश्यक होते असे नमूद केले. याबाबत पाठपुरावा करणेबाबतच्या सूचना मा. अध्यक्षांनी महाबळेश्वर न.प. यांना दिल्या. | मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | समितीची दुसरी बैठक अ.क्र.४ :- महाबळेश्वर पांचगणी प्रदेशातील टोल वसुली. | महाबळेश्वर पांचगणी प्रदेशातील टोल वसुली नगर परिषद व वन विभाग यांचेकडून एकत्रितपणे सुरु झाल्याचे उपवनसंरक्षक, सातारा यांनी सभेस अवगत केले. | |
| | | समितीची दुसरी बैठक अ.क्र.५ :- राष्ट्रीय लेक संवर्धन योजना. | सदर प्रस्तावाबाबत केलेल्या कार्यवाही बाबतची माहिती मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद यांनी दिली. त्यावर यापुर्वीच्या बैठकीत स्पष्ट निर्देश दिले असून त्यानुसार पुढील योग्य उचित कार्यवाही करावी, असे मा.अध्यक्ष यांनी नमूद केले. | मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद |
| | | समितीची दुसरी बैठक अ.क्र. ६:- महाबळेश्वर नगर परिषद हद्दीतील प्रस्तावांचे सादरीकरण. अ) बॅबिंग्टन हाऊस - ग्रेड १ | बॅबिंग्टन हाऊस या मिळकतीची पाहणी दि. ७/१२/२०१६ रोजी मा. अध्यक्ष, मा. सदस्य श्री. रवी रानडे व सदस्य सचिव यांचे उपस्थितीत करण्यात आली. सदर इमारती वारसा स्थळाच्या मिळकतीच्या यादीनुसार मिळकत क्र.३९ ग्रेड-१ यामध्ये समाविष्ट आहे. ग्रेड-१ प्रकारच्या इमारतीच्या बाबतीत विकासाच्या व्याप्तीमध्ये खालील तरतुद नमुद आहे. No intervention be permitted either on exterior or interior unless it is necessary in the interest of strengthening and prolonging the life of building(s) or precincts or any part of features thereof. For this purpose, absolutely essential and minimum changes shall be allowed and they must be in accordance with the original. त्यानुषंगाने सदर इमारतीमध्ये अंतर्गत सुधारणा करण्यास वाव असल्याने, सदर इमारतीच्या अर्जदारांनी सादर केलेल्या सुधारणा प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यास हरकत नसल्याबाबत निष्कर्ष सर्वानुमते अनुमानित करण्यात आला. तथापि अर्जदारांच्या दुरुस्ती / सुधारणा प्रस्तावाबाबत सविस्तर अभ्यास करुन विकासाची व्याप्ती, विकास / सुधारणा करणे आवश्यक असलेल्या बाबी, त्याकरिता उपयोगात आणावयाचे साहित्य, त्यांचे डिझाईन इत्यादीच्या अनुषंगाने मा.सदस्यांनी त्यांचे अहवाल / मत पुढील बैठकीत ठेवावेत. जेणेकरुन त्यानुषंगाने सुधारणा प्रस्तावातील बाबींनिहाय लागु निकष / अटी नुसार वारसा स्थळ जतन समिती त्याची शिफारस करु शकेल, असे मा.अध्यक्ष यांनी नमुद केले. विद्यमान दोन खोल्यांच्या मधील भिंत काढुन एकच मोठी खोली करण्याचे प्रस्तावित आहे, तसेच सदर इमारतीचा पाया | सदस्य सचिव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | का खचतो आहे ? याबाबत स्ट्रक्चरल इंजिनियर यांचा दाखला / अहवाल तत्पुर्वी उपलब्ध करुन घेणेबाबत मा.अध्यक्ष यांनी सदस्य सचिव यांना सूचना दिल्या. | |
| | | ब) महाबळेश्वर क्लब - ग्रेड १ | महाबळेश्वर क्लब या मिळकतीची पाहणी दि. ७/१२/२०१६ रोजी मा. अध्यक्ष, मा. सदस्य श्री. रवी रानडे व सदस्य सचिव यांचे उपस्थितीत करण्यात आली. या ठिकाणी काही जुन्या इमारती पाडून आहे त्याच ठिकाणी नवीन इमारती बांधणे प्रस्तावित आहे. याबाबत सदर जुन्या इमारती अधिकृत आहेत अगर कसे याबाबत मंजुर बांधकाम नकाशे,सिटी सर्व्हे शिटस् व विकास योजनेचा विद्यमान जमीन वापर नकाशा इ. आधारे तपासणी करणे आवश्यक आहे. सर्व स्ट्रक्चरच्या अधिकृततेबाबत तपासणी करणे आवश्यक असून मूळ मंजुर नकाशावर/ सिटी सर्व्हे शिटवर इमारती नसतील तर त्या काढून टाकणे आवश्यक आहे याबाबतचा अहवाल मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद यांनी पुढील बैठकीच्या वेळी सादर करणेबाबत मा. अध्यक्ष यांनी सूचना दिल्या. | मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद व सदस्य सचिव |
| | | क) नॉन परेल व्हयु – ग्रेड ३ | नॉन परेल व्हयु या मिळकतीची पाहणी दि. ७/१२/२०१६ रोजी मा. अध्यक्ष,मा. सदस्य श्री. रवी रानडे व सदस्य सचिव यांचे उपस्थितीत करण्यात आली. सदर मिळकती मधील माळी क्वार्टस ही इमारत पाडून अन्य जागेवर सदर माळी क्वार्टस बांधण्याचे प्रस्तावित आहे. सदर माळी क्वार्टस मध्ये मागील व बाजूचा खुला व्हरांडा बंदिस्त केला आहे. त्यामुळे या मिळकतीचा चटई क्षेत्र निर्देशांक शिल्लक असेल तर जमिनीवरील अस्तित्वातील इमारतीच्या फुट प्रिंट न बदलता, त्याच जागेवर सदर इमारत बांधता येईल. वर नमुद सुचनेनुसार अस्तित्वातील इमारतीच्या जागेवर बांधकाम प्रस्तावित करुन प्रस्ताव नगर परिषदेकडे सादर केल्यास त्यावर चटई क्षेत्राची गणना करुन निर्णय घेता येईल, असे मा.अध्यक्ष यांनी नमूद केले. | सदस्य सचिव |
| | | ड) बाजार – ग्रेड ३ | डॉ. साबणे रोडवरील सि.स.नं. ६/ब व १० या दोन बांधकाम परवानगी संदर्भात या मिळकतीची पाहणी दि. ७/१२/२०१६ रोजी मा. अध्यक्ष, मा. सदस्य श्री. रवी रानडे व सदस्य सचिव यांचे समवेत करण्यात आली. डॉ. साबणे रोड साठी विद्यमान रस्त्यापासुन १.५० मी. झाडे लावण्यासाठी जागा + ३.० | मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद व सहायक संचालक नगर रचना, सातारा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | मी. सेट बॅक असे एकूण ४.५ मी. समोरील अंतर सोडून बांधकाम करणे आवश्यक आहे. तथापि बाजार या हेरिटेज प्रॉपर्टीमध्ये येणाऱ्या डॉ. साबणे रोडच्या दोन्ही बाजूस ४.५ मी. अंतरात अतिक्रमण करुन या जागेचा वापर वाणिज्य कारणासाठी होत असलेचे दिसुन आले.त्यामुळे या संपुर्ण परीसराचे विद्रुपीकरण झाले असलेने वारसा स्थळ जतन समितीचे मा.अध्यक्ष व सदस्य यांनी प्रत्यक्ष पाहणी वेळी तीव्र नाराजी व्यक्त केली. रेग्युलर लाईन ऑफ स्ट्रिट मध्ये येणारी सर्व बांधकामे त्वरित काढून टाकणेबाबत मा. अध्यक्ष यांनी मुख्याधिकारी, महाबळेश्वर यांना सूचना दिल्या. तसेच **सि.स.नं.६/ब व १० या जागेवरील दोन्ही बांधकाम परवानगीबाबत समितीने मान्यता दिली.** तथापि सहाय्यक संचालक, न.र. यांनी जमिनीच्या उताराबाबत पुन्हा एकदा खात्री करण्याबाबत व आवश्यकतेनुसार त्यात सुधारणा करणेबाबत मा.अध्यक्षांनी सूचना केली.<br>तसेच डॉ.साबणे रोडवरील आजतागायत दिलेल्या बांधकाम परवानगीची यादी व प्रत्यक्षात होत असलेला वापर इ.चे अनुषंगाने मुख्याधिकारी महाबळेश्वर न.प.यांनी अहवाल सादर करण्याच्या सूचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या. | |
| | | समितीची दुसरी बैठक अ.क्र. ७:- पांचगणी नगर परिषद हद्दीतील प्रस्तावांचे सादरीकरण.<br>अ) होमी व्हिला- ग्रेड २बी | होमि व्हिला या मिळकतीची पाहणी दि. ७/१२/२०१६ रोजी मा. अध्यक्ष,मा. सदस्य श्री. रवी रानडे व सदस्य सचिव यांचे उपस्थितीत करण्यात आली. या प्रस्तावामध्ये होमी व्हिला या बंगल्याच्या तीन बाजुस नवीन बांधकामास परवानगी अपेक्षिली आहे. प्रत्यक्ष पाहणीवेळी या ठिकाणी अनेक अनाधिकृत बांधकामे दिसुन आली, अशी अनाधिकृत बांधकामे प्रथमतः निष्काषीत केल्यानंतरच या जागेत नवीन बांधकाम परवानगी देण्याबाबत विचार करता येऊ शकेल असे मा.अध्यक्ष यांनी नमुद केले. सदर जागेवरील अनाधिकृत बांधकामाबाबत पुढील वैधानिक कार्यवाही मुख्याधिकारी पांचगणी नगर परिषद यांनी करावी अशा सुचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या. | मुख्याधिकारी पांचगणी नगर परिषद |
| २ | विषय क्र.२ | सातारा नगर परिषद हददीतील वारसा स्थळां बाबत दाखल अपिला बाबत मा.संचालक, | सातारा नगर परिषदेकडील १४९ वारसा स्थळांपैकी ३८ वारसा स्थळे अंतिम करण्यात आली व १५ मिळकतधारकांनी मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे | मुख्याधिकारी सातारा नगर परिषद |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी नगर परिषदेस दिलेल्या पत्राबाबत चर्चा व त्यावरील मुख्याधिकारी, सातारा नगर परिषद यांचे सादरीकरण. | यांचेकडे अपिल दाखल केले आहे. त्यानुषंगाने मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदर अपिलाबाबत सद्यस्थितीत वारसा स्थळ जतन समिती अस्तित्वात आल्याने त्यांचे मत घ्यावे, असे मुख्याधिकारी, नगर परिषद, सातारा यांना दि.१७/१०/२०१६ चे पत्रान्वये कळविले असून त्यावर वारसास्थळ जतन समितीने निर्णय घेणे अपेक्षित आहे असे सदस्य सचिव यांनी विषद केले. त्यावर मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनीच त्यावर निर्णय घ्यावा असे मा.अध्यक्षांनी नमुद केले. | |
| ३ | विषय क्र.३ | वाई नगरपरिषद हद्दीतील वारसा स्थळांची यादी अंतिम करणेबाबत. | वाई नगरपरिषद हद्दीतील हेरिटेज मिळकतींची यादी अंतिम करण्याची कार्यवाही मुख्याधिकारी वाई नगरपरिषद यांनी करणेबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना केली. | मुख्याधिकारी वाई नगरपरिषद |
| ४ | विषय क्र.४ | नगर परिषदेकडून वारसा स्थळ जतन समितीपुढे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर चर्चा. | समितीपुढे सादरीकरण करावयाच्या प्रस्तावाची संबंधित नगर परिषदेने सविस्तर छाननी करुन तो सदस्य सचिव यांचेमार्फत सादर करण्याचे निश्चित झाले होते. तथापि मागील बैठकीनंतर या बैठकीत सादरीकरणासाठी कोणताही नविन प्रस्ताव प्राप्त झाला नसल्याचे सदस्य सचिव यांनी नमुद केले. | |
| ५ | विषय क्र.५ | मा.अध्यक्षांच्या मान्यतेने आयत्या वेळचे विषय | अ) अशासकिय समिती सदस्यांच्या भत्यांबाबत प्रस्ताव मा.संचालक, नगर रचना यांचेकडे सादर केला असलेचे सदस्य सचिव यांनी नमुद केले. यावर पाठपुरावा करणेबाबत मा.अध्यक्षांनी सूचना केली.<br>ब) सदर बैठकीत मंजुर करावयाच्या नकाशावर कमिटीच्या शिक्क्या बाबत चर्चा झाली. मा.अध्यक्ष यांनी शिक्क्याचा मसुदा पुढील बैठकीत तयार करुन सादर करणेबाबत तसेच पत्रात किंवा इतिवृतामध्ये मंजुरीचा तपशिल नमुद करणेबाबत सुचना दिल्या.<br>क) पांचगणी व महाबळेश्वर न.प.हद्दीतील तसेच प्रादेशिक योजनेतील सर्व नॅचरल हेरिटेज स्थळांची पाहणी करणेकामी मा.सदस्य डॉ.जय सावंत तसेच मा.सदस्य शिवाजीराव चव्हाण व उपवन संरक्षक, सातारा यांची समिती गठीत केली. सदर समितीने समन्वयाने सर्व नॅचरल हेरिटेज साईट्सची पाहणी करुन त्याचा अहवाल लवकरात लवकर सादर करावा अशा सूचना | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | मा.अध्यक्ष यांनी दिल्या.<br>ड) वारसा स्थळांच्या वर्गीकरणाबाबत अवलंबावयाच्या निकष / कार्यवाही बाबत मा.सदस्य श्री. रवि रानडे यांनी तयार केलेल्या कार्यपध्दतीचे सविस्तर विवेचन केले व सदर कार्यपध्दती निकषानुसार मा.सदस्य श्री.रवि रानडे यांनी पुणे येथील शनिवार वाडा या वारसा स्थळाचे वर्गीकरणाबाबत सविस्तर सादरीकरण केले. सदर श्री.रवि रानडे यांनी तयार केलेला वारसा स्थळांचे वर्गीकरण ठरविणेबाबतचा निकष प्रस्ताव सर्व सदस्यांना पाठवुन पुढील बैठकित प्राप्त सूचना विचारात घेऊन याबाबत निर्णय घेणे योग्य राहील असे मा.अध्यक्ष यांनी नमूद केले.<br>इ) वारसा स्थळ जतन समितीसमोर आलेल्या प्रस्तावाबाबतच समितीमध्ये चर्चा, स्थळ पाहणी त्यानुसार आवश्यक सुधारणा / दुरुस्ती इत्यादीबाबत कार्यवाही केली जाते. तथापि ज्या वारसा स्थळांचे प्रस्ताव येत नाहीत, त्याबाबत समितीच्या परवानगी शिवाय काही बदल झाले / केले आहेत किंवा कसे, याबाबत कोणतेही अभिलेख / डॉक्युमेंटेशन उपलब्ध / तयार केले गेलेले नाहीत. सबब सर्व वारसा स्थळांचे जतन / संवर्धन करणेकामी या सर्व वारसा स्थळांना भेट देणे आवश्यक आहे. असे मा.रवि रानडे व डॉ.जय सामंत यांनी नमूद केले. यावर मा.अध्यक्ष यांनी सदर मुद्दा हा महत्वाचा असून, याकामी डॉक्युमेंटेशन करणे आवश्यक असलेने याबाबतची निश्चित कार्यवाही काय करता येईल, याबाबत सदस्य सचिव यांनी पुढील बैठकीत अहवाल सादर करणेबाबत सूचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या. | |

कमिटीची पुढील बैठकीची तारीख १७/०१/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता वाई नगरपरिषदेच्या सभागृहात घेण्याचे निश्चित होऊन व उपस्थितांचे आभार मानुन मा.अध्यक्षांच्या मान्यतेने बैठक संपल्याचे सदस्य सचिव यांनी जाहीर केले .

(श्रीकांत देशमुख)
सदस्य सचिव,
हेरिटेज कॉन्झर्वेशन कमिटी तथा
सहायक संचालक, नगर रचना, सातारा

(दिलीप बंड)
अध्यक्ष,
हेरिटेज कॉन्झर्वेशन कमिटी
महाबळेश्वर, पांचगणी, वाई, सातारा नगर परिषद
व महाबळेश्वर-पांचगणी प्रदेश

"सातारा, वाई, पांचगणी व महाबळेश्वर नगर परिषद तसेच प्रादेशिक योजना, महाबळेश्वर पांचगणी क्षेत्र" या करिता
**वारसास्थळ जतन समिती**

---

राजभवन, दरबार हॉल, महाबळेश्वर येथे दि. 03.06.2017 रोजी सकाळी ११.00 वाजता संपन्न
**झालेल्या बैठकीचे इतिवृत्त**

"सातारा, वाई, पांचगणी व महाबळेश्वर नगर परिषद तसेच प्रादेशिक योजना, महाबळेश्वर पांचगणी क्षेत्र" या करिता वारसास्थळ जतन समितीची पाचवी बैठक मा. दिलीप बंड (Retired I.A.S.) यांच्या अध्यक्षतेखाली दि.03/06/2017 रोजी सकाळी ११.00 वाजता राजभवन, दरबार हॉल, महाबळेश्वर येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस वारसास्थळ जतन समितीचे खालील मा. सदस्य व निमंत्रित सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्य | पद |
|---|---|---|
| 1 | मा. दिलीप बंड (Retired I.A.S.) | अध्यक्ष |
| 2 | श्री. रवी रानडे, | सदस्य |
| 3 | श्रीमती वैशाली प्र.लाटकर | सदस्य |
| 4 | डॉ. श्री. जय शा. सामंत | सदस्य |
| 5 | श्री. अच्युत वाटवे | सदस्य |
| 6 | डॉ. श्री. शिवाजीराव का. चव्हाण | सदस्य |
| 7 | श्री.अविनाश पाटील, सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे | सदस्य |
| 8 | सहायक संचालक, नगर रचना, सातारा | सदस्य सचिव |
| 9 | श्री.किरण यादव, जिल्हा न.प.प्रशासन अधिकारी, सातारा | विशेष निमंत्रक |
| 10 | मुख्याधिकारी, सातारा नगर परिषद | विशेष निमंत्रक |
| 11 | मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद | विशेष निमंत्रक |
| 12 | मुख्याधिकारी, पाचगणी नगर परिषद | विशेष निमंत्रक |
| 13 | मुख्याधिकारी, वाई नगर परिषद | प्रतिनिधी |
| 14 | उपवनसंरक्षक, सातारा | प्रतिनिधी |

सहायक संचालक, नगर रचना, सातारा तथा सदस्य सचिव, वारसा स्थळ जतन समिती यांनी मा. अध्यक्ष व मा. सदस्य तसेच उपस्थितांचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या अनुमतीने आवश्यक गणपुर्ततेच्या खातरजमेअंती बैठकीचे कामकाज सुरु केले. खालील विषयी विषयवार सादरीकरण व चर्चा होऊन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ.क्र | विषय | | चर्चा / निर्णय | अपेक्षित कार्यवाही यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| **1** | | **2** | **3** | **4** |
| 1 | **विषय क्र.१** | वारसास्थळ जतन समितीची दि. 4/03/2017 रोजी संपन्न झालेल्या चौथ्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे व चौथ्या बैठकीनंतर आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणेबाबत. | वारसास्थळ जतन समितीच्या दि.०४/०३/२०१७ रोजी संपन्न झालेल्या चौथ्या बैठकीचे इतिवृत्ताबाबत कोणाचीही हरकत प्राप्त झाली नसलेने बैठकीचे इतिवृत्त कायम करण्याची विनंती सदस्य सचिव यांनी केली, त्यास मा.अध्यक्ष यांनी मान्यता दिली. | ---- |
| | | समितीची चौथी बैठक अ.क्र.1 :- वारसा स्थळे यादी प्रसिध्द करणेबाबत | महाबळेश्वर व पांचगणी नगर परिषदेच्या मंजुर वारसा स्थळांची यादी व नकाशा नगरपरिषदेच्या बेवसाईटवर प्रसिध्द केला असल्याने वाई व सातारा नगर परिषदेची यादी व नकाशा अंतिम करण्याची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर सदर यादी व नकाशा वेब साईटवर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करण्याच्या सुचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या. | 1) मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा<br>2) मुख्याधिकारी, वाई नगरपरिषद वाई. |
| | | समितीची चौथी बैठक अ.क्र.२ :- सातारा नगर परिषद हद्दीतील हेरिटेज मिळकती | मागील बैठकीत सुचना दिल्यानुसार सातारा नगर परिषद हद्दीतील १४९ वारसा स्थळांची यादी ई मेलवर तसेच टपालाने देखील सर्व सदस्यांना पाठविली असल्याचे पाठविली असल्याचे सदस्य सचिव यांनी नमुद केले. तथापि काही सदस्यानी सदर यादी मिळाली नसल्याचे नमुद केले. त्यामुळे सातारा नगर परिषद हद्दीतील १४९ वारसा स्थळांची यादी इमेलवर सर्व सदस्यांना पाठविण्याच्या सूचना मा.अध्यक्षांनी दिल्या. तसेच सातारा न.प. हद्दीतील १४९ वारसा स्थळांपैकी ३८ वारसा स्थळे अंतिम केलेले आहेत. तथापि 111 स्थळे का वगळली याची कारणमिमांसा काय आहे याबाबतच्या अहवाल तसेच BEAG यांनी समितीकडे सादर केलेली सातारा न.प. क्षेत्रातील वाढीव वारसा स्थळांच्या समावेशाबाबत कारणमिमांसेसह अहवाल तयार करुन सदर अहवाल पुढील बैठकीपुर्वी सर्व समिती सदस्यांना ईमेल वर पाठविण्याच्या सूचना मा.अध्यांक्षानी दिल्या.तसेच या विषया बाबत पुढील बैठकीत मुख्याधिकारी, सातारा न.प. यांनी सादरीकरण करावे अशा सूचना मा. अध्यक्ष यांनी दिल्या. | मुख्याधिकारी, सातारा नगर परिषद |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | समितीची चौथी बैठक अ.क्र. ३ :- हेरिटेज नियमावली तील दुरुस्त्यां बाबत. | BEAG तर्फे श्रीमती हेमा रमाणी यांनी चारही नगर परिषदांच्या नियमावलीत एकसारखेपणा येणे कामी नियमावलीत काही दुरुस्त्या सुचविल्या आहेत. याबाबत मागील बैठकीत सदस्य सचिव, मा. सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे व सर्व न.प.चे मुख्याधिकारी यांनी एकत्रितपणे चर्चा करुन निर्णय घेणेकामी मा. अध्यक्ष यांनी सूचना दिलेल्या होत्या तथापि अशी बैठक अद्याप झाली नसल्याने सर्व मुख्याधिकाऱ्यांची एकत्रित बैठक घेऊन पुढील बैठकीपूर्वी नियमावलीतील दुरुस्त्या/ सुधारणां बाबत अहवाल सादर करत असल्याचे सदस्य सचिव यांनी सांगितले त्यानुसार कार्यवाही करण्याबाबत मा. अध्यक्षांनी सूचना केली. | 1) सर्व संबंधित मुख्याधिकारी<br>2) सदस्य सचिव |
| | | समितीची चौथी बैठक अ.क्र.४ :- सातारा नगर परिषद क्षेत्रातील अंतिम वारसा स्थळांचे यादीत वाढ करणेबाबत. | BEAG मुंबई यांनी समितीकडे सादर केलेली सातारा नगर परिषद क्षेत्रातील वाढीव वारसा स्थळांच्या प्राथमिक यादीतील सर्व वारसा स्थळांची पाहणी करुन निर्णय घेणे योग्य होईल असा निर्णय मागील बैठकीत झाला होता. त्यानुसार सातारा न.प. हद्दीमधील काही वारसा स्थळांची पाहणी समितीचे सदस्य श्रीमती वैशाली लाटकर व श्री.चेतन सहस्त्रबुध्दे यांनी केली असलेचे त्यांनी बैठकीत माहिती दिली. यावर चर्चा होऊन मा.अध्यक्ष यांनी पुढील बैठकीपूर्वी सर्व वारसा स्थळांची पाहणी करणेच्या सूचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या. | 1) समिती सदस्य,<br>2) मुख्याधिकारी, सातारा न.प. |
| | | समितीची चौथी बैठक अ.क्र. ५ :- नैसर्गिक वारसा स्थळांच्या ठिकाणचा अनधिकृत विकास व सिमांकनाबाबत. | महाबळेश्वर येथील व प्रदेशातील अनाधिकृत बांधकामाबाबत BEAG ने लक्ष वेधले होते. याबाबत मागील बैठकीत चर्चा होऊन जागा पाहणी बाबत सुचना देण्यात आलेल्या होत्या. महाबळेश्वर न.प.ने अनाधिकृत बांधकामाची पाहणी करणेकरिता दि.३१/०३/२०१७ च्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी वाई यांचेकडे वेळ व दिनांक निश्चित करुन मिळणेस विनंती केली होती. तथापि सदर स्थळपाहणी अद्याप झाली नसल्याचे दिसुन येते. पांचगणी न.प.ने हद्दीमधील वारसा स्थळांच्या ठिकाणांची पाहणी करण्यात आलेली असुन सदर ठिकाणी विना परवाना विकास झालेला नाही, याबाबतची खात्री करण्यात आलेली आहे, असे दि.०२/०५/२०१७ च्या पत्रान्वये कळविले असलेचे सदस्य सचिव यांनी माहिती दिली यावेळी सविस्तर चर्चा होऊन राष्ट्रीय हरीत लवाद पुणे यांचे न्यायालयात चालु असलेल्या दाव्यात उपविभागीय अधिकारी वाई यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली असुन, सदर समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने | 1) मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगरपरिषद<br>2) मुख्याधिकारी, पांचगणी नगरपरिषद. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | याबाबतचा अहवाल मुख्याधिकारी महाबळेश्वर व पांगणी यांनी पुढील बैठकित सादर करावा, अशा सुचना माध्यक्ष यांनी दिल्या | |
| 2 | | समितीची चौथी बैठक विषय क्र. २ :-<br>महाबळेश्वर नगर परिषद हद्दीतील प्रस्तावांचे सादरीकरण.<br>अ) बॅबिंग्टन हाऊस - ग्रेड १ | मागील बैठकीत झालेल्या निर्णयानुसार मा. अध्यक्ष यांच्या स्वाक्षरीने सविस्तर आदेश क्र.१००८,दि.०७/०४/२०१७ अन्वये दिलेले आहेत. तसेच सदस्य सचिव यांच्या स्वाक्षरीने नकाशे महाबळेश्वर न.प.स पाठविण्यात आले असलेने सदर प्रकरणी कार्यवाही पुर्ण झाली असलेची माहिती सदस्य सचिव यांनी समितीस दिली. सदर काम सुरु झाल्यानंतर प्रत्येक टप्प्यावर अर्जदार यांचेकडुन माहिती / फोटो उपलब्ध करुन घेणेबाबत मा.अध्यक्षांनी मुख्याधिकारी महाबळेश्वर न.प. यांना सुचना दिल्या. | मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगरपरिषद |
| | | ब) नॉन परेल व्हयु – ग्रेड ३ | मागील बैठकीत झालेल्या निर्णयानुसार मा. अध्यक्ष यांच्या स्वाक्षरीने सविस्तर आदेश क्र. १००९ दि. ०७/०४/२०१७ अन्वये दिलेले आहेत. तसेच बांधकाम नकाशाची छाननी करण्याचे काम सुरु असून छाननी करुन अभिप्राय न.प.स कळविण्यात येत आहेत असे सदस्य सचिव यांनी माहिती दिली. यावर मा.अध्यक्ष यांनी पुढील कार्यवाही त्वरीत करण्याच्या सूचना दिल्या. | सदस्य सचिव |
| | | क) बाजार – ग्रेड ३ | मागील बैठकीत समितीने दिलेल्या सुचनेनुसार सि.स.नं. ६ब व १० च्या प्रकरणी जोता पातळी (Plinth Level) पर्यंत बांधकाम परवानगी बाबत मा. अध्यक्ष यांच्या स्वाक्षरीने सविस्तर आदेश क्र.१०१० व १०११ दि.०७/०४/२०१७ अन्वये दिले आहेत. तसेच सदस्य सचिव यांच्या स्वाक्षरीने जोता पातळी (Plinth Level) पर्यंतचे नकाशे महाबळेश्वर न.प.स पाठविण्यात आले असलेने सदर प्रकरणी कार्यवाही पुर्ण झाली असलेची माहिती सदस्य सचिव यांनी समितीस दिली. तसेच सदर परवानगी जोतापातळी पर्यंत दिली असल्याने जोत्यावरील बांधकामास त्वरित परवानगी देणे आवश्यक असल्याचे तसेच डॉ. साबणे रस्त्यास सन्मुख असल्यास मिळकतींच्या उंचीबाबत निर्णय होणे आवश्यक असल्याचे मत सदस्य सचिव यांनी मांडले.सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा झाली डॉ. साबणे रोडवरील मिळकतींच्या पुढील सामासिक अंतरात असलेले अनधिकृत बांधकाम काढून टाकल्याशिवाय एकसारखेपणा येणार नाही असे डॉ. जय सामंत यांनी नमूद केले. या रस्त्यावरील ६० ते ७० % बांधकामे यापूर्वी झाली असून या मिळकतींचा सुधारित बांधकामांचा प्रस्ताव तसेच उर्वरित | 1) सदस्य सचिव<br>2) श्री. चेतन सहस्त्रबुध्दे<br>3) श्रीमती वैशाली लाटकर<br>4) संबंधित मिळकत-धारकाचे वास्तुविशारद |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | मिळकतींचा बांधकाम परवानगीची प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतरच डॉ. साबणे रस्त्यासन्मुख सर्व मिळकतींना एकसारखे इलेव्हेशन देऊन डॉ. साबणे रोड या वारसा स्थळ मिळकतीचा विकास करावा लागेल असे मत मा. सहसंचालक, न.र. पुणे विभाग यांनी व्यक्त केले या विषयाबाबत सविस्तर चर्चा होऊन समितीमधील कॉन्झर्व्हेशन आर्किटेक्ट यांनी या रस्त्यावरील चार जुन्या इमारतींचे इलेव्हेशन विचारात घेऊन, चार पर्यायी इलेव्हेशन तयार करावे तसेच सि.स.नं. ६ ब व १० या मिळकतींचे वास्तुविशारद यांनी देखील पर्यायी चार इलेव्हेशन तयार करणेबाबत मा.अध्यक्ष यांनी सुचना दिल्या. त्यानंतर याबाबतचा निर्णय पुढील बैठकीत घेण्यात येईल असा निर्णय झाला. | |
| | | पांचगणी नगर परिषद हद्दीतील प्रस्तावांचे सादरीकरण.<br>अ) मेहेरबाई हाऊस ग्रेड-3 | मागील बैठकीत समितीने दिलेल्या सुचनेनुसार मा.अध्यक्ष यांच्या स्वाक्षरीने सविस्तर आदेश क्र.१००७ दि.०७/०४/२०१७ अन्वये दिलेले आहेत. बांधकाम नकाशाची छाननी केली असुन, रस्ता रुंदीकरणाचे क्षेत्र वगळुन चटई क्षेत्र निर्देशांक विचारात घेता स्विमिंग टँक लगतची चेंजिंग रुम अनुज्ञेय होत नसल्याने चेंजिंग रुम वगळुन स्विमिंग टँक व दुरुस्ती / सुधारणा बाबतचे सुधारित नकाशे सादर करणेबाबत वास्तुविशारद यांना सुचना देण्यात आल्या असलेचे माहिती सदस्य सचिव यांनी समितीस दिली. यावर मा.अध्यक्ष यांनी पुढील कार्यवाही त्वरीत करण्याच्या सूचना सदस्य सचिव यांना दिल्या. | सदस्य सचिव |
| | | ब) टेबल लँड ग्रेड-१ मधील विकास परवानगीबाबत. | टेबल लँड येथील विकास कामांच्या परवानगीबाबत या कार्यालयाने सुचविलेल्या दुरुस्तीप्रमाणे दुरुस्त नकाशा न.प.ने या कार्यालयास सादर केलेला आहे. तथापी सदर नकाशावरील तपशिल वाचनिय नसलेने सुधारित नकाशे सादर करणे आवश्यक असलेचे सदस्य सचिव यांनी समितीस माहिती दिली. यावर मा.अध्यक्ष यांनी पुढील कार्यवाही त्वरीत करण्याच्या सूचना सदस्य सचिव व मुख्याधिकारी महाबळेश्वर न.प.यांना दिल्या. | 1) मुख्याधिकारी, पाचगणी नगरपरिषद, पाचगणी.<br>2) सदस्य सचिव |
| 3 | विषय क्र.२ | सातारा शहरातील जुना व नवा राजवाडा या ऐतिहासिक वास्तुंची दखल घेणेबाबत मा.श्री.शिवेंद्रसिंहराजे भोसले | सातारा शहरातील प्रारुप हेरिटेज यादीतील अ.क्र. ९३ प्रतापसिंह हायस्कुल (जुना राजवाडा) तसेच अ.क्र. ९४ नवीन राजवाडा या सरकारी मिळकती ग्रेड-1 च्या ऐतिहासिक वास्तु आहेत. सदर वास्तुंची अत्यंत दुरावस्था झाली असल्याने जुना राजवाडा व नविन राजवाडा या ऐतिहासिक वास्तुंच्या देखभाल व दुरुस्तीबाबत पाहणी होऊन | 1)मुख्याधिकारी सातारा नगर परिषद<br>2)सदस्य सचिव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | (विधानसभा सदस्य) यांचे अर्जावर विचार करणे. | सदरचा अहवाल शासनाकडे पाठविणेबाबत संबंधितांना योग्य ते आदेश देणेबाबतचे पत्र मा.शिवेंद्रसिंहराजे भोसले, विधानसभा सदस्य, सातारा यांनी मा.अध्यक्ष, वारसा स्थळ जतन समिती यांच्या नावे दिले असल्याचे नमूद करुन सदरचे पत्र समितीसमोर विचारार्थ् ठेवण्यात आले. तसेच यापूर्वी दि.०५/१०/२०१६ रोजी संपन्न झालेल्या वारसा स्थळ जतन समितीच्या दुस-या बैठकीत आयत्या वेळच्या विषयात श्रीमंत छत्रपती शिवाजीराजे भोसले यांनी सातारा येथील जुना / नविन राजवाडा मुळ मिळकत धारकांच्या ताब्यात दिल्यास त्याची देखभाल / दुरुस्ती हेरिटेज कमिटीच्या मार्गदर्शनानुसार स्वखर्चाने करु अशा आशयाचे निवेदन समिती सदस्य डॉ.शिवाजीराव चव्हाण यांनी बैठकीत वाचुन दाखविले. त्यावर चर्चा हाऊन ९९ वर्षाचा करार संपल्यानंतर हस्तांतरणाचा विषय पुर्णतः जिल्हाधिकारी, सातारा यांचेशी संबंधित असून तो हेरिटेज कमिटीच्या अखत्यारित येत नसल्याचे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. त्यानुसार या कार्यालयाने पत्र क्र.३७०६ दि.११/११/२०१६ अन्वये समितीचा निर्णय श्रीमंत छत्रपती शिवाजीराजे भोसले यांना कळविला असल्याचे सदस्य सचिव यांनी समितीस निवेदन केले. सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा होऊन जुना व नविन राजवाडा या दोन्ही ऐतिहासिक वास्तुंची पाहणी करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करता येईल यासाठी सविस्तर अहवालासह डिपीआर तयार करणे आवश्यक असल्याचे मत मा. सहसंचालक, नगर रचना यांनी मत मांडले यानंतर मा. अध्यक्षांनी समितीमार्फत पाहणी होऊन अहवाल शासनास सादर करणेबाबत सूचना दिल्या. | |
| | **विषय क्रमांक 3 :-** | महाबळेश्वर येथील सि.स.नं.१०६ या मिळकतीवरील आरक्षणाबाबत महाबळेश्वर क्लब यांचे अपिल अर्जाबाबत. | अध्यक्ष, दि.क्लब महाबळेश्वर यांनी दि.२४/०४/२०१७ च्या पत्रान्वये क्लब महाबळेश्वर यांचे मालकीचे महाबळेश्वर येथील सि.स.नं.१०६ या क्षेत्रावर मंजुर विकास योजना महाबळेश्वर मध्ये प्रस्तावित कार पार्किंगच्या आरक्षणाबाबत वारसा स्थळ जतन समितीकडे अपिल दाखल केले असल्याचे नमूद करुन सदर पत्र समितीसमोर निर्णयार्थ ठेवले. तसेच महाबळेश्वर शहराच्या दुसऱ्या सुधारित मंजूर विकास योजनेनुसार महाबळेश्वर येथील सि.स.नं.१०६ च्या उत्तर हद्दीलगत विद्यमान रस्त्यास प्रस्तावित केलेल्या ६.०० मी. रुंद | सदस्य सचिव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | रस्तारुंदीकरणाने अंशतः क्षेत्र बाधित होत आहे तसेच या जागेच्या पुर्व कोप-यात त्रिकोणी आकाराचे आ.क्र. ४२-“पार्किंग” हे आरक्षण प्रस्तावित असुन उर्वरित क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट आहे.महाबळेश्वर नगरपरिषदेची हेरिटेज नियमावली शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र.टिपीएस-1815/ प्र.क्र.२४९/१५/वि.यो.हेरिटेज/नवि-13 दि.२९/१०/२०१५ अन्वये मंजुर झाली असुन सदर नियमावली सोबतच्या हेरिटेज यादीनुसार अ.क्र.६२ वर क्लब महाबळेश्वर ही ग्रेड - I मिळकत आहे. महाबळेश्वर नगर परिषद हद्दीतील वारसा स्थळे दर्शविणारा नकाशा महाबळेश्वर नगर परिषदेने प्रसिध्द केला असुन सदर नकाशावर दर्शविलेल्या क्लब महाबळेश्वर ची हद्दीचे अवलोकन करता मंजुर सुधारित विकास योजनेत प्रस्तावित केलेले आ.क्र.४२-“पार्किंग” हे आरक्षण क्लब महाबळेश्वर या हेरिटेज मिळकतीबाहेर प्रस्तावित असलेचे दिसुन येत असल्याचा अहवाल सदस्य सचिव यांनी समितीसमोर सादर केला. याबाबत सविस्तर चर्चा होऊन अध्यक्ष, दि क्लब महाबळेश्वर यांनी सादर केलेले अपिल अर्जाबाबत वारसा स्थळ जतन समितीने कार्यवाही करणे अपेक्षित नाही असा निर्णय झाल्याने त्यानुसार वस्तुस्थिती नमूद करुन सेबधितांना कळविणेबाबत मा. अध्यक्ष यांनी सदस्य सचिवांना सूचना दिल्या. | |
| | **विषय क्रमांक 4 :-** | महाबळेश्वर नगर परिषद हद्दीतील डॉ.साबणे रोडवरील मिळकतींचा सर्वेक्षण अहवाल समितीसमोर सादर करणेबाबत. | डॉ. साबणे रोडवरील मिळकतीच्या सर्वेक्षण अहवाल मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगरपरिषद यांनी सादर केला असून सविस्तर सादरीकरण करण्यात आले यावेळी डॉ. साबणे रोडवर एकूण ८७ मिळकती असून यापैकी ५४ मिळकती नवीन आहेत तर ३५ जुनी बांधकामे आहेत. यापैकी ५ मिळकतींना पूर्वीच्या वारसा स्थळ जतन समितीची मान्यता प्राप्त असल्याचे नमूद केले. मा. अध्यक्ष यांनी डॉ. साबणे रोडवरील सेट बॅक अंतरामधील अनधिकृत बांधकामाबाबत मागील दि. ७/१२/२०१६ च्या बैठकीत दिलेल्या सूचनांनुसार काय कार्यवाही केली याबाबत विचारणा केली. यावेळी मुख्याधिकारी यांनी प्रयत्न केला नाही असे नमूद केले. या विषयाबाबत सविस्तर चर्चा होऊन डॉ. साबणे रोडवरील समोरील सामासिक अंतरात झालेल्या अनधिकृत बांधकामाबाबत पावसाळा झाल्यानंतर दि. ३० सप्टेंबर नंतर कार्यवाही करण्याचे आदेश मा. अध्यक्षानी मुख्याधिकारी यांना दिले. दरम्यान | 1) मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगरपरिषद<br>2) सदस्य सचिव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | सर्व संबंधितांना नोटीस बजावण्याबाबत मा. अध्यक्षांनी सूचना दिल्या. तसेच सदर नोटीशीचा नमुना legal point of view सदस्य सचिव यांचेकडुन तपासुन घेऊन नोटीस बजावण्यात याव्यात,अशा सुचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या. | |
| | **विषय क्रमांक 5 :-** | पांचगणी नगर परिषद हद्दीतील मार्केट या रस्त्यावरील मिळकतींचा सर्वेक्षण अहवाल समितीसमोर सादर करणेबाबत. | मुख्याधिकारी पांचगणी यांनी अहवाल सादर केला आहे. तथापी या विषयाबाबत चर्चा झाली नाही.त्यामुळे याविषयाबाबत पुढील बैठकीत सादरीकरण करणे आवश्यक आहे. | |
| | **विषय क्रमांक ६ अः-** | महाबळेश्वर नगर परिषद हद्दीतील मेघ भौतिक विज्ञान प्रयोगशाळा बांधकाम परवानगी. | महाबळेश्वर येथील सि.स.नं.१३४ पैकी १००० चौ.मी. या जागेमधील मेघभौतिक विज्ञान प्रयोगशाळा या सुधारीत बांधकामाबाबतचा डायरेक्टर, भारतीय उष्णदेशीय मौसम विज्ञान संस्थान, पृथ्वी विज्ञान मंत्रालय, भारत सरकार, पुणे यांचा प्रस्ताव वारसा स्थळ जतन समितीसमोर ठेवणेबाबत मुख्याधिकारी महाबळेश्वर नगरपरिषद यांनी विनंती केली आहे. सदर विषयाबाबत संस्थेचे वास्तुविशारद यांनी सादरीकरण केले. तसेच उक्त जागेवरील बांधकाम नकाशांना सहायक संचालक, नगर रचना, सातारा यांनी पत्र क्र. १३८८, दि. २६/५/२०१४ अन्वये सुधारीत मंजुरीची शिफारस केली आहे. सदर शिफारस पत्रातील अटींनुसार वारसा स्थळ जतन समितीची मंजुरी घेणे आवश्यक असल्याने त्यानुसार सदरचा प्रस्ताव सुधारित बाधकाम नकाशांना वारसा स्थळ जतन समितीच्या मंजुरीसाठी सादर केला असल्याचे नमूद केले. या विषयाबाबत सदस्य सचिव यांनी सदर मिळकत हेरिटेज यादीतील अ.क्र. ५ वरील Beckwith Monument या ग्रेड- I मिळकतीलगत असल्याने यापूर्वीच्या हेरिटेज कमिटीने दि. ४/६/२०११ रोजी झालेल्या बैठकीत मूळ बांधकाम प्रस्तावास मंजुरी दिली असल्याचे नमूद केले. सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा होऊन सदर जागेवरील सुधारित बांधकाम नकाशांना वारसा स्थळ जतन समितीची मान्यता देणेबाबतचा निर्णय झाला, त्यानुसारचे आदेश तयार करण्याच्या सूचना मा. अध्यक्ष यांनी सदस्य सचिवांना दिल्या. | सदस्य सचिव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **विषय क्रमांक ६ ब:-** | महाबळेश्वर नगर परिषद हद्दीतील सि.स.नं.१९७ व १९८ माऊंट माल्कम या मिळकतीच्या विकसनाबाबत. | महाबळेश्वर येथील माऊंट माल्कम ग्रेड – II A सि.स.नं.१९७ क्षेत्र ७२७४२ चौ.मी. पैकी रिटेनेबल क्षेत्र १६६४७.०० चौ.मी. जागेमध्ये डायरेक्टर, मेक वेव्हज सी रिसॉर्ट प्रा.लि.यांनी नवीन ४ बंगलो बांधकामास परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव वारसा स्थळ जतन समितीसमोर ठेवणेबाबत मुख्याधिकारी महाबळेश्वर नगरपरिषद यांनी विनंती केली आहे.सदर विषयाबाबतचे सादरीकरण संबंधित संस्थेच्या वास्तुविशारद यांनी केले. संबंधित संस्थेने खाली नमुद केल्यानुसार कारणे नमुद करुन विद्यमान पडीक अवस्थेत असलेले बांधकाम पाडुन नवीन ४ बंगले बांधणे आवश्यक असलेचे नमुद केले आहे. सोबत जुन्या पडीक इमारतीचे फोटो सोबत सादर केले आहेत.<br>• इमारतीमधील खोल्यांचे छत भग्न अवस्थेत असुन त्याला आधार देणारे लाकडी वासे/ लाकडी सांगाडे व खांब पुर्णपणे कुजलेले आहे.व अनेक ठिकाणी मोडकळीस येऊन छत कोसळले आहे.त्यामुळे पावसाचे पाणी संपुर्णपणे इमारतीत येत आहे.<br>• खिंडक्यांची तावदाने व लाकडी चौकटी सडलेल्या / कुजलेल्या असुन मोडकळीस आलेल्या आहेत.<br>• इमारतीमधील जमिनीचा बहुंताशी भाग हा खचलेला आहे तसेच अनेक ठिकाणी भेगा पडुन जमिनीला खड्डे पडले आहेत.<br>• भिंती आणि गिलाव्याला भेगा पडुन त्या, ठिकठिकाणी मोडकळीस आलेल्या आहेत.<br>• इमारतीचा दर्शनी भाग कोळमोडुन पडलेला आहे. त्याच व्हरांडा देखील भग्न अवस्थेत आहे.<br>सदर विषयाबाबत महाबळेश्वर नगरपरिषदेच्या मंजूर यादीनुसार अ.क्र.100 वर Mount Malcolm (Sans Soucci) ही ग्रेड - II A मिळकत असल्याचे सदस्य सचिव यांनी नमूद केले तसेच ग्रेड - II A मधील Scope of Changes समितीस वाचून दाखविले. त्यानंतर सविस्तर चर्चा होऊन ग्रेड - II A मध्ये नवीन बांधकाम अनुज्ञेय होणार नसल्याचा निर्णय झाला. अर्जदारांनी आहे त्याच जोत्यावर नवीन परवानगीसाठी अर्ज करता येईल तथापि सदर मिळकत महाबळेश्वर शहर वसविलेल्या माऊंट माल्कम यांच्या नावाने असल्याने सदर मिळकत विकसित करत असताना जुन्या फुटप्रिंटवरच, या मिळकतीचे जुने फोटो तसेच जुना अभिलेख | 1)मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगरपरिषद<br>2)सदस्य सचिव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | शोधून त्यानुसार सुसंगत सदर मिळकत विकसित करणे आवश्यक असल्याचा निर्णय झाला. अर्जदारांनी विद्यमान हेरिटेज मिळकत पाडून नवीन 4 बंगले बांधणेचा सादर केलेल्या प्रस्तावास मंजुरी देता येणार नाही असा निर्णय मा. अध्यक्ष यांनी दिला. | |
| | **विषय क्रमांक 7 :-** | मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने आयत्या वेळचे विषय.<br>1) महाबळेश्वर येथील सि.स.नं. २३३ येथील एम.पी.जी.क्लब (परशी जिमखाना) ग्रेड -१ या मिळकतीमधील बांधकाम परवानगीबाबत. (प्राप्त दि.३१/०५/२०१७) | महाबळेश्वर न.प. हद्दीतील सि.स.नं. २३३ येथील एम.पी.जी. क्लब ग्रेंड । या मिळकती मधील बांधकाम परवानगीचा प्रस्ताव नगरपरिषदेकडून बैठकीपूर्वी ३ दिवसापूर्वी या कार्यालयास प्राप्त झाला आहे त्यामुळे सदर प्रस्तावावर या कार्यालयामार्फत कोणतीही छाननी झालेली नाही. तथापि संबंधितांना याबाबतचे सादरीकरणास परवानगी दयावी अगर कसे याबाबत सदस्य सचिव यांनी विचारणा केली या प्रकरणाशी संबंधाने अर्जदार उपस्थित होते. अर्जदारांनी थोडक्यात विषय समजून सांगितला. तथापि नगरपरिषदेने प्रस्ताव सादर करताना कोणतीही छाननी न करता सदरचा प्रस्ताव सादर केला असल्याने सदर प्रस्ताव पुढील बैठकीत निर्णयात ठेवणेबाबत सदस्य सचिव यांनी नमूद केले यावर मा. अध्यक्षांनी सदर प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करणेबाबत सूचना दिल्या. | |
| | | 2) हेरिटेज इमारती मध्ये हॉटेल / रिसॉर्ट अनुज्ञेय करणेबाबत. | हेरिटेज इमारतीमध्ये हॉटेल / रिसॉर्ट अनुज्ञेय करता येईल अगर कसे याबाबत चर्चा होणे आवश्यक असलेचा मुद्दा आयत्यावेळच्या विषयांमध्ये उपस्थित करण्यात आला होता. यावेळी अधक्षांच्या परवानगीने चर्चा करण्यात आली.चर्चेवेळी महाबळेश्वर वारसा स्थळांच्या नियमावलीवलीतील नियम क्र. नुसार वारसा स्थळ जतन करणेकामी, वारसा स्थळ इमारतीमध्ये जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने व वारसा स्थळ जतन समितीच्या सल्याने वास्तुमध्ये काही भागात वाणिज्य वापर अनुज्ञेय असल्याचे निर्दशनास आणुन देण्यात आले. तथापी सदर वास्तु पुर्णपणे मोडकळीस आली असल्यास,त्याच स्वरुपात नविन वास्तु बांधुन व संपुर्ण जागेचा चटई क्षेत्र विचारात घेऊन इतर नविल इमारती अनुज्ञेय होतील किंवा कसे व त्यामध्ये हॉटेल / मॉटेल / रिसॉर्ट / Entertainment स्वरुपाचे वापर अनुज्ञेय करणेबाबत अभ्यास करुन पुढील बैठकीत चर्चा करणे योग्य राहील बैठकीत ठरले. | |

सातारा नगरपरिषद हद्दीतील सर्व वारसा स्थळांची पाहणी समिती सदस्यांनी केल्यानंतर तसेच सातारा,वाई, पांचगणी व महाबळेश्वर या चारही नरपरिषदांच्या नियमावली बाबत एकत्रित बैठक करुन याबाबतचा अहवाल तयार झाल्यांनतर पुढील बैठकीची तारीख व ठिकाण त्यानंतरच निश्चित केले जाईल असे मा. मा.अध्यक्षांनी जाहिर केले. त्यांनतर मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने उपस्थितांचे आभार मानुन बैठक संपल्याचे सदस्य सचिव यांनी जाहीर केले .

**सही/-**
(**श्रीकांत देशमुख**)
सदस्य सचिव,
वारसा स्थळ जतन समिती,
तथा
सहायक संचालक, नगर रचना, सातारा

**सही/-**
(**दिलीप बंड**) (Retired I.A.S.)
अध्यक्ष,
वारसा स्थळ जतन समिती,
महाबळेश्वर, पांचगणी, वाई, सातारा नगर परिषद
व महाबळेश्वर-पांचगणी प्रदेश

---

जिल्हा परिषद विस्तारीत इमारत,
पहिला मजला, सातारा – 415001
दुरध्वनी क्र.०२१६२/239241.
जा.क्र.वा.स.ज.स./बै.क्र.५/इतिवृत/
ससंसा/2519
सातारा दिनांक २९/०६/२०१७

प्रति,

---------------------------
---------------------------
---------------------------
---------------------------

2/- यांचेकडे माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी.

(**श्रीकांत देशमुख**)
सदस्य सचिव,
वारसा स्थळ जतन समिती,
तथा
सहायक संचालक, नगर रचना, सातारा

"सातारा, वाई, पांचगणी  व महाबळेश्वर नगर परिषद तसेच प्रादेशिक योजना, महाबळेश्वर पांचगणी क्षेत्र" या करिता
**वारसास्थळ जतन समिती**

-------------------------------------------------------------------------------------------------------------------

विधान भवन, पुणे  येथे दि. 29.07.2017 रोजी दुपारी ०३.00 वाजता संपन्न
**झालेल्या  बैठकीचे इतिवृत्त**

"सातारा, वाई, पांचगणी  व महाबळेश्वर नगर परिषद तसेच प्रादेशिक योजना, महाबळेश्वर पांचगणी क्षेत्र" या करिता वारसास्थळ जतन समितीची सहावी बैठक मा. दिलीप बंड, I.A.S. (Retired) यांच्या अध्यक्षतेखाली दि.29/07/2017 रोजी दुपारी ०३.00 वाजता विधानभवन, पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस वारसास्थळ जतन समितीचे खालील मा. सदस्य व निमंत्रित सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्य | पद |
|---|---|---|
| 1 | मा. दिलीप बंड, I.A.S. (Retired) | अध्यक्ष |
| 2 | मा.श्रीमती श्वेता सिंघल, I.A.S. जिल्हाधिकारी सातारा | सदस्य |
| 3 | श्री. चेतन सहस्त्रबुध्दे, Conservation Architech | सदस्य |
| 4 | श्रीमती वैशाली लाटकर, Conservation Architech | सदस्य |
| 5 | डॉ. श्री. जय शा. सामंत, पर्यावरणतज्ञ | सदस्य |
| 6 | श्री.  अच्युत वाटवे,Structural Counsulatant | सदस्य |
| 7 | डॉ. श्री. शिवाजीराव का. चव्हाण,इतिहास तज्ञ | सदस्य |
| 8 | श्री.अविनाश पाटील, सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे | सदस्य |
| 9 | श्री. श्रीकांत देशमुख, सहायक संचालक, नगर रचना, सातारा | सदस्य सचिव |
| 10 | प्रादेशिक उपसंचालक, नगरपरिषद प्रशासन, पुणे विभाग, पुणे. | विशेष निमंत्रक |
| 11 | मुख्याधिकारी, सातारा नगर परिषद यांचे  प्रतिनिधी | विशेष निमंत्रक |
| 12 | मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद | विशेष निमंत्रक |
| 13 | मुख्याधिकारी, पाचगणी नगर परिषद | विशेष निमंत्रक |
| 14 | मुख्याधिकारी, वाई नगर परिषद | विशेष निमंत्रक |
| 15 | उपवनसंरक्षक, सातारा यांचे  प्रतिनिधी | विशेष निमंत्रक |

सहायक संचालक, नगर रचना, सातारा तथा सदस्य सचिव, वारसा स्थळ जतन समिती यांनी मा. अध्यक्ष व मा. सदस्य तसेच उपस्थितांचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या अनुमतीने आवश्यक गणपुर्ततेच्या खातरजमेअंती बैठकीचे कामकाज सुरु केले. खालील विषयी विषयवार सादरीकरण व चर्चा होऊन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ.क्र | विषय | | चर्चा / निर्णय | अपेक्षित कार्यवाही यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| 1 | | 2 | 3 | 4 |
| 1 | **विषय क्र.१** | वारसास्थळ जतन समितीची दि. 3/06/२०१७ रोजी संपन्न झालेल्या पाचव्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे व पाचव्या बैठकीनंतर आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणेबाबत. | वारसास्थळ जतन समितीच्या दि.०३/06/2017 रोजी संपन्न झालेल्या पाचव्या बैठकीचे इतिवृत्ता बाबत कोणाचीही हरकत प्राप्त झाली नसलेने बैठकीचे इतिवृत्त कायम करण्याची विनंती सदस्य सचिव यांनी केली, त्यास मा.अध्यक्ष यांनी मान्यता दिली. | ---- |
| 2 | | समितीची चौथी बैठक अ.क्र. ३ :- हेरिटेज नियमावली तील दुरुस्त्यां बाबत. | BEAG तर्फे श्रीमती हेमा रमाणी यांनी चारही नगर परिषदांच्या नियमावलीत एकसारखेपणा येणे कामी नियमावलीत काही दुरुस्त्या सुचविल्या आहेत. याबाबत सातारा येथे आयोजित केलेली बैठक होऊ शकली नाही. त्यामुळे BEAG मुंबई यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह नियमावलीची प्रत सर्व संबधित नगरपरिषदांना या कार्यालयाचे पत्र क्र. २७७६, दि. २०/०७/२०१७ अन्वये पाठविली असून सदर प्रकरणी म.प्रा. व न.र. अधिनियम,१९६६ चे कलम ३७ अन्वये पुढील वैधानिक कार्यवाही नगरपरिषदेने करुन याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर वारसा स्थळ जतन समितीच्या मान्यतेनंतर नियमावली दुरुस्तीबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल अशी माहिती सदस्य सचिव यांनी दिली. याबाबत बैठकीमध्ये सविस्तर चर्चा होऊन सदर कार्यवाही करण्यास नगरपरिषदांना मुदत देणे आवश्यक असल्याचे मत झाले त्यानुसार सदर कार्यवाही ऑगस्टच्या तिसऱ्या आठवडयापर्यंत पूर्ण करुन अहवाल सादर करणेबाबत मा. अध्यक्ष यांनी सर्व मुख्याधिकाऱ्यांना सूचना दिल्या. | सर्व संबंधित मुख्याधिकारी |
| 4 | | समितीची पाचवी बैठक विषय क्र. २ - सातारा शहरातील जुना व नवा राजवाडा या ऐतिहासिक वास्तुंची दखल घेणेबाबत मा.श्री.शिवेंद्रसिंहराजे भोसले (विधानसभा सदस्य) यांचे | वारसा स्थळ जतन समितीच्या पाचव्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार समिती सदस्यांच्या उपस्थितीत जुना राजवाडा तसेच नवीन राजवाडा पाहणी दि. १३/०७/२०१७ करण्यात आली आहे. याबाबतचा अहवाल सदस्य मा. श्रीमती वैशाली लाटकर यांनी बैठकीत सादर केला. जुना राजवाडा वापरात आहे तर नवीन राजवाडा वापरात घेणे आवश्यक असुन या दोन्ही वाड्यांची डागडुजी करणे आवश्यक असलेचे मत | सदस्य सचिव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | अर्जावर विचार करणे. | श्रीमती लाटकर मॅडम यांनी व्यक्त केले. याबाबत चर्चा होऊन मा.सदस्य वैशाली लाटकर यांनी सादर केलेला अहवाल, पुढील कार्यवाहीसाठी मा.जिल्हाधिकारी सातारा यांचेकडे सादर करणेबाबत मा.अध्यक्ष यांनी सदस्य सचिव यांना सुचना दिल्या. | |
| 5 | | समितीची पाचवी बैठक विषय क्र. ५- पांचगणी नगर परिषद हद्दीतील मार्केट या रस्त्यावरील मिळकतींचा सर्वेक्षण अहवाल समिती समोर सादर करणेबाबत. | पांचगणी नगरपरिषद हद्दीतील बाजार ग्रेड - I आहे. या बाजार ग्रेड - I सन्मुख मिळकतींचा सर्व्हे नगरपरिषदेने करुन याबाबतचे सादरीकरण मुख्याधिकारी,पांगचणी न.प.यांनी केले. या रस्त्यावर एकुण ६५ मिळकती असुन यापैकी काही मिळकतींनी दुरुस्ती परवाना देणेबाबत संबधित मिळकत धारक यांचेकडुन विचारणा होत असल्याने याबाबतचे धोरण निश्चित करणेबाबत मुख्याधिकारी यांनी विनंती केली. यावेळी सविस्त्र चर्चा होऊन बाजार मधील अनेक मिळकती मोडकळीस आलेने, या मिळकतींची दुरुस्ती न झाल्यास सदर बांधकामे पडुन जातील. त्यामुळे बाजार ग्रेड - I या मुख्य रस्त्यास सन्मुख असलेल्या मिळकतींना सर्व इमारतीचे फसाड / इलेव्हेशन सारखेच ठेऊन, दुरुस्ती परवानगी देणे आवश्यक असलेचे सर्व सदस्यांचे मत झाले. याबाबत चर्चा होऊन बाजार वरील मिळकतीचे इलेव्हेशनबाबत हेरिटेज सर्व्हे केलेल्या intech या संस्थेकडुन पर्यायी इलेव्हेशन घेणेबाबत, मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगर परिषद यांनी intech संस्थेशी संपर्क साधुन याबाबतची पुढील कार्यवाही करणेच्या सूचना असे मा.अध्यक्ष यांनी दिल्या. | |
| 6 | | समितीची पाचवी बैठक विषय क्र. ६अ - महाबळेश्वर नगर परिषद हद्दीतील मेघ भौतिक विज्ञान प्रयोगशाळा बांधकाम परवानगी. | मागील दि.०३/०६/२०१७ रोजीच्या बैठेकीत महाबळेश्वर येथील सि.स.नं.१३४ पैकी १००० चौ.मी.या जागेमधील मेघभौतिक विज्ञान प्रयोग शाळा या सुधारीत बांधकामाबाबतचा डायरेक्टर, भारतीय उष्णदेशीय मौसम विज्ञान संस्थान, पृथ्वी विज्ञान मंत्रालय, भारत सरकार, पुणे यांच्या प्रस्तावास वारसा स्थळ जतन समितीने मान्यता दिली असुन त्यानुसार आदेश तयार करुन मा. अध्यक्षांच्या स्वाक्षरीने निर्गमित करण्यात आले. | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | | समितीची पाचवी बैठक विषय क्र. ६ब<br>महाबळेश्वर नगर परिषद हद्दीतील सि.स.नं.१९७ व १९८ माऊंट माल्कम या मिळकतीच्या विकसनाबाबत. | महाबळेश्वर येथील माऊंट माल्कम ग्रेड – II A सि.स.नं.197 क्षेत्र 72742 चौ.मी. पैकी रिटेनेबल क्षेत्र 16647.00 चौ.मी. जागेमध्ये डायरेक्टर, मेक वेव्हज सी रिसॉर्ट प्रा.लि.यांनी नवीन 4 बंगले बांधणेचा सादर केलेल्या प्रस्तावास मंजुरी देता येणार नाही असा निर्णय मागील बैठकीत झाला असलेने, त्यानुसार आदेश तयार करुन मा. अध्यक्षांच्या स्वाक्षरीने निर्गमित करण्यात आले. | -- |
| 8 | विषय क्र.२ | सातारा न.प. हद्दीतील वारसा स्थळांची अंतिम यादी तयार करताना वगळलेल्या स्थळां बाबत कारणमिमांसे सह मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद यांचे सादरीकरण तसेच सातारा नगर परिषद क्षेत्रातील अंतिम वारसा स्थळांचे यादीत वाढ करणेबाबत. | सातारा नगर परिषद क्षेत्रातील BEAG मुंबई यांनी समितीकडे सादर केलेली वाढीव वारसा स्थळांच्या प्राथमिक यादीतील सर्व वारसा स्थळांची पाहणी करुन निर्णय घेणे योग्य होईल असा निर्णय मागील बैठकीत झाला होता. त्यानुसार काही वारसा स्थळांची पाहणी समितीचे सदस्य श्रीमती वैशाली लाटकर व श्री.चेतन सहस्त्रबुध्दे यांनी केली होती. तथापि पावसामुळे सर्व वारसा स्थळांची पाहणी करणे शक्य झाले नसल्याची माहिती मा.सदस्य श्रीमती लाटकर यांनी दिली. तसेच स्थळपाहणीच्या प्रवास भत्याबाबत मा.सदस्य श्री. सहस्त्रबुध्दे यांनी विचारणा केली यावर सदस्यांच्या बैठक भत्ता व प्रवास भत्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती कडे सादर केला असून सातारा न.प. हद्दीतील वारसा स्थळांच्या पाहणीसाठी सदस्यांनी तारीख निश्चित करुन कळविल्यास साताऱ्यामधील व्यवस्था आम्ही करु असे सदस्य सचिव यांनी सांगितले. यावर चर्चा होऊन स्थळ पाहणी अहवाल तयार झाल्यानंतर सर्व सदस्यांना उपलब्ध करुन त्यानंतर पुढील बैठकीत सादरीकरण करावे अशा सूचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या. | 1) समिती सदस्य,<br>2) सदस्य सचिव,<br>3) मुख्याधिकारी, सातारा न.प. |
| 9 | विषय क्र.३ | वाई नगरपरिषद हद्दीतील वारसा स्थळांची अंतिम यादी तयार करताना वगळलेल्या स्थळांबाबत कारणमिमांसे सह मुख्याधिकारी वाई न.प. यांचे सादरीकरण. | वाई नगर परिषद हद्दीतील वारसा स्थळांच्या यादीबाबत समितीच्या दि.०३/०६/२०१७ रोजी झालेल्या पाचव्या बैठकीत सविस्तर चर्चा झालेली आहे, वारसा स्थळांच्या प्राथमिक यादीमध्ये एकूण १९७ वारसा स्थळांचा समावेश आहे. यापैकी ९० वारसा स्थळे मुख्याधिकारी स्तरावर वगळली असुन, १०७ वारसा स्थळे अंतिम केली आहेत. अंतिम केलेल्या वारसास्थळांबाबत ८ अपिल प्राप्त आहेत. प्राथमिक यादीतील ९० वारसा स्थळे का वगळली ?, याबाबत कारणमिमांसा देणे आवश्यक आहे. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | त्यामुळे नगर परिषद हद्दीतील सर्वच वारसा स्थळांची यादी सर्व समिती सदस्यांना इमेल व्दारे पुरवुण याबाबतचा सविस्तर अहवाल तयार करुन याबाबतचे सादरीकरण समितीच्या बैठकीत करणे बाबत मुख्याधिकारी वाई नगरपरिषद यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार याबाबतचे सादरीकरण मुख्याधिकारी वाई न.प. यांनी केले. प्राथमिक यादीतील वगळलेल्या स्थळांबाबत सविस्तर चर्चा झाली. व यासर्व जागांची पाहणी मा.सदस्य, कन्झरव्हेशन आर्किटेक्ट श्रीमती लाटकर मॅडम व चेतन सहस्त्रबुध्दे यांनी करावे याबाबतचा अहवाल पुढील बैठकीत सादर करावा असा निर्णय मा.अध्यक्ष यांनी दिला. | |
| 10 | विषय क्र.४ | नैसर्गिक वारसा स्थळांच्या ठिकाणाचा अनाधिकृत विकास व सिमांकनाबाबत. | मागील बैठकीत सुचना दिल्याप्रमाणे सदस्य सचिव यांनी अनाधिकृत बांधकामाची पाहणी दि. 21/०७/२०१७ रोजी मुख्याधिकारी, महाबळेश्वर व वन विभागाचे प्रतिनिधी यांचे समवेत केली असलेचे नमुद करुन अ) लिंगमळा लगतची स्मशानभूमी ब) कॅनॉट पिक लगतचा वॉच टॉवर क) धोबी नाल्यालगतचा सिमेंट बंधारा ड) वेणा लेक परीसरातील उपक्रम याबाबत माहिती सदस्य सचिव यांनी दिली. तसेच म.प्रा. व न.र. अधि.१९६६ चे कलम ५८ नुसार शासनाचे विभागामार्फत विकासकाम करावयाचे असल्यास त्याचे नकाशे सक्षम प्राधिकरणाकडे प्रथमतः सादर करुनच सर्व संबधित शासकिय यंत्रणांनी बांधकाम करणे असल्याचे नमुद केले. शासकीय यंत्रणानी केलेल्या बांधकामाबाबत संबधितांकडुन justification घेणे आवश्यक आहे. तसेच केलेले काम योग्य असले तर कार्यात्तर मंजुरी देणेबाबत विचार करता येऊ शकेल. असे मत सदस्य मा.जिल्हाधिकारी सातारा यांनी व्यक्त केले. याबाबत सविस्तर चर्चा होऊन, हेरिटेज नियमावलीनुसार स्कायलाईट डिस्र्टब होणार नाही. याची काळजी घेणे आवश्यक असुन म.प्रा. व न.र. अधि.१९६६ चे कलम ५८ नुसार बांधकाम / विकास काम करताना प्रथमतः परवानगी घेऊनच काम करणे आवश्यक असलेचे मत झाले तसेच हेरिटेज नियमावली सर्व शासकीय यंत्रणांना सर्क्युलेट करुन जिल्हाधिकारी सातारा कार्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी असे आदेश मा. अध्यक्ष यांनी दिले. | 1) मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगरपरिषद<br>2) मुख्याधिकारी, पांचगणी नगरपरिषद. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 11 | विषय क्र.५ | महाबळेश्वर नगर परिषद हद्दीतील सि.स.नं.९४, ९५ व ९६ नॉन परेल व्हयू या जागेतील माळी कॉटेज बांधकामास परवानगी देणेबाबत. | उक्त प्रस्तावातील विद्यमान बांधकामाची खात्री करणेसाठी या जागेचा टोटल स्टेशन मशिन आधारे सर्व्हे करुन सदर नकाशावर कंटुर, विद्यमान बांधकामे व जागेवरील झाडे दर्शवून नकाशा सादर करणेबाबत मुख्याधिकारी, म.श्वर न.प. यांना पत्र क्र. २८६०, दि.२८/०७/२०१७ अन्वये कळविले असुन नकाशा प्राप्त झालेनंतर चटई क्षेत्राबाबतची छानणी करुन आवश्यकतर वरिष्ठ कार्यालयाचे मार्गदर्शन घेऊन, न.प.स अभिप्राय कळविण्यात येत आहेत. अशी माहिती सदस्य सचिव यांनी दिली. या मिळकतीचे चटई क्षेत्राबाबत काही अडचण अथवा शंका असल्यास, प्रस्ताव कार्यालयास सादर करणेबाबत सदस्य मा.सहसंचालक, नगर रचना पुणे विभाग पुणे यांनी सूचना दिल्या.यावर मा.अध्यक्ष यांनी सदर प्रस्तावास समितीने मंजुरी देऊन बराच कालावधी झाला असलेने, याबाबत त्वरीत निर्णय घेणेबाबत सूचना मा.अध्यक्ष यांनी सदस्य सचिव यांना दिल्या. | सदस्य सचिव |
| 12 | विषय क्र.६ | महाबळेश्वर नगर परिषद हद्दीतील डॉ.साबणे रोड बाजार ग्रेड-३ या वरील मिळकतींचा सर्वेक्षण अहवाल तसेच बांधकाम परवानगी बाबत. | मागील बैठकीत सूचना दिल्या नुसार डॉ.साबणे रोड वरील मिळकतीचे इलेव्हेशन अंतिम करणेसाठी सि.स.नं. ६ ब व १० या मिळकतींचे वास्तुविशारद यांचेकडुन पर्यायी चार इलेव्हेशन प्राप्त करुन घेणेबाबत या कार्यालयाने म.श्वर न.प. स पत्रक्र.२४९८, दि. २८/६/१७ अन्वये कळविले तसेच मा.समिती सदस्य श्री. चेतन सहस्त्रबुध्दे व श्रीमती वैशाली लाटकर यांचेकडुन चार इलेव्हेशन प्राप्त करुन घेऊन डॉ. साबणे रस्त्यास सन्मुख सर्व मिळकतींना एकसारखे इलेव्हेशन देऊन डॉ. साबणे रोड या वारसा स्थळ मिळकतीचा विकासाबाबत निर्णय होणे आवश्यक असल्याचे सदस्य सचिव यांनी सांगितले. याबाबत चर्चा होऊन डॉ.साबणे रोड वरील मिळकतीचे इलेव्हेशनबाबत हेरिटेज सर्व्हे केलेल्या intech या संस्थेकडुन पर्यायी इलेव्हेशन घेऊन याबाबत अंतिम निर्णय पुढील बैठकीत घेणेत येईल त्यानुसार मुख्याधिकारी, महाबळेश्वरनगर परिषद यांनी intech संस्थेशी संपर्क साधुन याबाबतची पुढील कार्यवाही करणेच्या सूचना असे मा.अध्यक्ष यांनी दिल्या.<br>डॉ. साबणे रोडवरील सेट बॅक अंतरामधील अनधिकृत बांधकामा बाबत मागील बैठकीत दिलेल्या सूचनांनुसार सर्व संबंधितांना बजावण्यात यावयाच्या नोटीशीचा नमुना legal point of view सदस्य सचिव यांचेकडुन तपासुन घेणेबाबत निर्णय झाला आहे. त्यानुसार | मुख्याधिकारी महाबळेश्वर न.प. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | मुख्याधिकारी, म.श्वर न.प.ने. पत्र क्र.वशीनं १५/ ११७, दि. २०/०७/२०१७ अन्वये नोटीसीचा नमुना तपासणी करीता या कार्यालयास सादर केला आहे. अन्य नगरपरिषदां कडील नोटीसीचा नमुन्याचा अभ्यास करुन नगरपरिषदेस मार्गदर्शन करण्यात येत असलेचे सदस्य सचिव यांनी माहिती दिली. याबाबत चर्चा होऊन डॉ.साबणे रोड वरील मिळकत धारकांची मुख्याधिकारी महाबळेश्वर यांनी एकत्रित बैठक घेऊन सर्व इमारतीच्या सामासिक अंतरातील बांधकाम काढुन घेऊन १० फुट ऊंचीवर ४ फुट रुंदीचा पत्रा बसवणेस परवानगी देणेत येईल. पावसापासुन व थंडीपासुन संरक्षण होईल तसेच यामुळे डॉ.साबणेरोड च्या सौदर्य आणखी खुलणार असलेचे सर्व संबधितांना अवगत करुन याबाबत निर्णय घेणे आवश्यक असलेचे मत मा.अध्यक्ष यांनी व्यक्त केले. | |
| 13 | **विषय क्रमांक 7 :-** | महाबळेश्वर नगर परिषद हद्दीतील प्रस्तावांचे सादरीकरण.<br>अ) महाबळेश्वर येथील सेक्टर-2, सि.स.नं.२०३ श्रीनिवास बंगला या जागेवरील बांधकाम परवानगी मिळणेबाबत. चिफ ट्रस्टी श्री यमाई देवी देवस्थान, औंध यांचा प्रस्ताव | सदर प्रस्तावाचे सादरीकरण करणेस संबधित वास्तुविशारद अथवा जमिन मालकांचे प्रतिनिधी हजर नसलेने, या प्रस्तावाचे सादरीकरण करता आले नाही. त्यामुळे पुढील बैठकीत याबाबतचे सादरीकरण करणेबाबत मा.अध्यक्ष यांनी सुचना दिल्या. | |
| 14 | | ब) महाबळेश्वर येथील सि.स.नं. २३३ येथील एम.पी.जी.क्लब (परशी जिमखाना) ग्रेड -IIA या मिळकतीमधील बांधकाम परवानगीबाबत. | महाबळेश्वर नगरपरिषदेच्या मंजुर हेरिटेज यादी नुसार महाबळेश्वर येथील सि.स.नं. 233 येथील एम.पी.जी.क्लब (परशी जिमखाना) ग्रेड II A मध्ये समाविष्ट आहे. ग्रेड II A विकसनाबाबत Grade II (A) - Internal changes and adaptive re-use and external changes may by and large be allowed but subject to strict scrutiny. Care shall be taken to ensure the conservation of all special aspects for which it is included in Heritage Grade II.<br>हेरिटेज नियमालीतील ग्रेड II A मिळकतीबाबत वरीलप्रमाणे तरतुदीचे अवलोकन करता विद्यमान इमारतीचे अंतर्गत व बाहय बदलास कडक काटेकोर छाननी करुन परवानगी देणेबाबत नमूद आहे. म्हणजेच ग्रेड II A मध्ये नवीन बांधकाम परवानगी अनुज्ञेय नसल्याचे | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | सदस्य सचिव यांनी नमुद केले. त्यानुसार या विषयाबाबत सविस्तर चर्चा होऊन या जागेत नवीन बांधकाम करता येणार नसल्याने, त्यानुसार अर्जदार यांना कळविण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या. | |
| 15 | | पांचगणी नगर परिषद हद्दीतील प्रस्तावांचे सादरीकरण. अ)पांचगणी न.प.मालकीचे न.र.यो.क्र.३ अ.भु.क्र.१७०/१ येथील डॉ.सावंत मार्केट विकसीत करणे बाजार ग्रेड-।. | पांचगणी न.प.मालकीचे न.र.यो.क्र. 3 मधील अ.भु.क्र.170/1 ही मिळकत बाजार ग्रेड- । या रस्त्यास सन्मुख आहे. या जागेवरील भाजी मार्केट विकसित करणेचा प्रस्ताव न.प.ने सादर केला असलेचे सदस्य सचिव यांनी माहिती दिली. यानंतर मा.अध्यक्षांच्या मान्यतेने सदर विषयाचे सादरीकरण नगरपरिषदेच्या वतीने वास्तुविशारद रवि कदम यांचे प्रतिनिधीने केले. याबाबत समितीचे सदस्यांची सविस्तर चर्चा झाली व बहुसंख्य सदस्यांनी या जागेवरील भाजी मार्केट अंत्यत कमी जागेत विकसीत होत असलेने, पार्किंग व अनेक बाबी उदभवणार असलेचे मत व्यक्त करुन सदर प्रस्ताव मंजुर करु नये असे मत मांडले. यावर मा.अध्यक्ष यांनी भाजी मार्केट साठी पर्यायी जागा शोधावी अथवा आहे तसेच मार्केट वापरावे असे मत झाले. | |

समितीच्या पुढील बैठकीची तारीख १६/०९/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा येथे घेण्याचे निश्चित झाले व याबाबतचे नियोजन मुख्याधिकारी, सातारा नगर परिषद यांनी करण्याचे मा.अध्यक्ष यांनी सुचना दिल्या. तसेच मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने उपस्थितांचे आभार मानुन बैठक संपल्याचे सदस्य सचिव यांनी जाहीर केले .

**सही/-**
(**श्रीकांत देशमुख**)
सदस्य सचिव,
वारसा स्थळ जतन समिती,
तथा
सहायक संचालक, नगर रचना, सातारा

**सही/-**
(**दिलीप बंड**) (I.A.S. Retired)
अध्यक्ष,
वारसा स्थळ जतन समिती,
महाबळेश्वर, पांचगणी, वाई, सातारा नगर परिषद
व महाबळेश्वर-पांचगणी प्रदेश

---

जिल्हा परिषद विस्तारीत इमारत,
पहिला मजला, सातारा – 415001
जा.क्र.वा.स.ज.स./बै.क्र.६/इतिवृत/ससंसा/3011
सातारा दिनांक 22/08/2017

प्रति, ---------------------------
---------------------------
---------------------------

2/- यांचेकडे माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी.

**सही/-**
(**श्रीकांत देशमुख**)
सदस्य सचिव,
वारसा स्थळ जतन समिती,तथा
सहायक संचालक, नगर रचना, सातारा